सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न 'ग्रह मिलन : सुखी आणि स्थिर विवाहाची एक शास्त्रीय कला' पुस्तकाचे प्रकाशन



छत्रपती संभाजीनगर | ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक सुधाकर कुलकर्णी ज्योतिष शास्त्री लिखित 'ग्रह मिलन : सुखी आणि स्थिर विवाहाची एक शास्त्रीय कला' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ ज्योतिषतज्ज्ञ गोविंद शास्त्री यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाला व्यासपीठावर प्रा. सोनाली हरसूलकर, डॉ. राजेंद्र मुळे, ॲड. शैलेश नाईक, विवेक गद्रे तसेच भुलेश्वर महाराज श्री कानीफनाथ संस्थान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुस्तकाचे प्रकाशन करताना गोविंद शास्त्री यांनी सुधाकर कुलकर्णी यांनी अत्यंत सखोल अभ्यास, परिश्रम आणि संशोधनातून हे परिपूर्ण पुस्तक तयार केल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. त्यांनी या पुस्तकात ज्योतिषशास्त्रातील ग्रह मिलनाच्या विषयाची शास्त्रीय व सखोल मांडणी केल्याचे गौरवोद्गार काढले.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी ज्योतिषशास्त्रावरील आपले विचार व्यक्त करत सुधाकर कुलकर्णी यांच्या कार्याचे कौतुक केले.

# वयोवृद्ध महिलेवर यशस्वी गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया; तिसऱ्याच दिवशी डिस्चार्ज



छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथील बीड बायपास रोडवरील ॲडव्हान्स मेडिसिटी सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ५५ वर्षीय महिला रुग्णावर यशस्वीरीत्या गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. विनोद भुक्तर यांनी यशस्वीपणे पार पाडली.

सदर रुग्ण डाव्या गुडघ्यातील तीव्र आर्थ्रायटिस, वॅरस विकृती (Varus Deformity) तसेच फ्लेक्शन कॉन्ट्रॅक्चर या समस्यांनी त्रस्त होती. त्यामुळे तिला चालणे, बसणे आणि दैनंदिन हालचाली करताना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत होता.

डॉ. विनोद भुक्तर यांनी अत्याधुनिक मिनिमली इनवेसिव्ह मसल-स्पेअरिंग सबव्हॅस्टस अप्रोचद्वारे डाव्या गुडघ्याचे टोटल नी रिप्लेसमेंट यशस्वीरित्या केले. या प्रगत तंत्रामुळे स्नायूंना कमी इजा होत असल्याने रुग्णाची पुनर्प्राप्ती अधिक जलद होते.

# स्कोडाने कोडियाकची नवीन श्रेणी सादर केली



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा १२ मे २०२६ : Skoda Auto India ने आपल्या आलिशान एसयूव्ही Skoda Kodiaq ची नवीन श्रेणी बाजारात सादर केली आहे. अधिक आधुनिक फीचर्स, स्पोर्टी डिझाइन आणि प्रगत तंत्रज्ञानासह ही नवीन कोडियाक ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

नवीन कोडियाक आता लाऊंज, स्पोर्टलाइन आणि सिलेक्शन एल अँड के अशा तीन व्हेरियंट्समध्ये उपलब्ध असेल. स्पोर्टलाइन व्हेरियंटमध्ये ADAS, 360 अंश कॅमेरा आणि पार्किंग असिस्ट यांसारखी अत्याधुनिक फीचर्स देण्यात आली आहेत. तर लाऊंज व्हेरियंटमध्ये मोठी बूट स्पेस, पॅनोरॅमिक सनरूफ आणि तीन-झोन क्लायमेट कंट्रोल यांसारख्या सुविधा मिळणार आहेत.

या एसयूव्हीमध्ये २.० टीएसआय पेट्रोल इंजिन देण्यात आले असून ते १५० किलोवॅट पॉवर आणि ३२० एनएम टॉर्क निर्माण करते. यासोबत सात-स्पीड डीएसजी ऑटोमॅटिक गिअरबॉक्स आणि 4x4 सिस्टीम स्टँडर्ड स्वरूपात देण्यात आली आहे. नवीन कोडियाकची प्रारंभिक किंमत ३६.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली आहे.

# दमदार आर्थिक कामगिरी

मुंबई - उज्जीवन स्मॉल फायनान्स बँके ने मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी मजबूत आर्थिक कामगिरी जाहीर केली. बँकेच्या कर्जपुस्तकात वार्षिक २६.६ टक्के वाढ नोंदली गेली असून तिमाहीतील आतापर्यंतचे सर्वाधिक वितरण रु. ९,८११ कोटी झाले. ठेवींमध्ये वार्षिक २१.४ टक्के वाढ होऊन त्या रु. ४५,६६८ कोटींवर पोहोचल्या, तर कासा प्रमाण २८.६ टक्क्यांवर गेले. व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव नौटियाल यांनी सांगितले की, बँक 'युनिव्हर्सल बँक' होण्याच्या ध्येयासाठी कटिबद्ध असून कर्जपुस्तक अधिक संतुलित आणि विविधीकृत करण्यावर भर दिला जात आहे.

# स्पार्क्स चे 'समर स्वॅग' कलेक्शन लॉन्च

मुंबई - स्पार्क्सने युवा वर्गासाठी नवीन स्प्रिंग-समर कलेक्शन सादर केले असून, 'समर स्वॅग' कॅम्पेनअंतर्गत शू-स्टाइल सँडल्सला विशेष प्राधान्य दिले आहे. हलके वजन, लवचिक रचना, मजबूत ग्रिप आणि ब्रीदेबिलिटीमुळे या सँडल्स दैनंदिन वापर, ट्रेकिंग आणि प्रवासासाठी उपयुक्त ठरणार आहेत. आधुनिक आणि स्पोर्टी डिझाइनमुळे त्या स्टाईल स्टेटमेंट म्हणूनही आकर्षण ठरत आहेत. गौरव कुमार दुआ यांनी सांगितले की, युवा ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा लक्षात घेऊन स्टाईल, आराम आणि बहुउपयोगिता यांचा संगम साधणारे हे उत्पादन बाजारात आणण्यात आले आहे.

# आरोग्य व जनजागृती कार्यक्रम आयोजित

छत्रपती संभाजीनगर -दत्ता मेघे इंस्टीट्यूट ऑफ हायर एजुकेशन एंड रिसर्च तर्फे 6 मे ते 12 मे दरम्यान आंतरराष्ट्रीय नर्सेस सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे संस्थेच्या विविध रुग्णालयांमध्ये कार्यरत नर्सिंग कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या समर्पण आणि महत्त्वपूर्ण योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग आणि शालिनीताई मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग येथील नर्सिंग कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.आंतरराष्ट्रीय नर्सेस दिन 2026 ची "अवर नर्सेस. अवर फ्युचर. एम्पावर्ड नर्सेस सेव लाइव्ह्स" ही संकल्पना संपूर्ण आठवडाभर आयोजित उपक्रमांचे मुख्य आकर्षण ठरली.

# 'स्मार्ट' टाकी लॉंच

मुंबई : भारताची अग्रगण्य आणि विश्वसनीय पाणी साठवण उत्पादक कंपनी, वेलस्पन वर्ल्डचा भाग असलेली सिंटेक्स महाराष्ट्रातील नाशिकमध्ये घेऊन आली आहे एक नाविन्यपूर्ण सिंटेक्स 'स्मार्ट' टाकी. ही टाकी 100% व्हर्जिन प्लास्टिकपासून तयार करण्यात आली आहे, ज्यामुळे ती फूड-ग्रेड असून दीर्घकालीन पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी सुरक्षित आहे आणि त्यामुळे भारतीय कुटुंबांच्या आरोग्य व कल्याणाला प्राधान्य दिले जाते. भारतीय कुटुंबांच्या बजेट-जाणिवेच्या गरजा लक्षात घेऊन, सिंटेक्सने SMART टाकी किफायतशीर दरात 8 वर्षांच्या वॉरंटीसह उपलब्ध करून दिली आहे, ज्यामुळे दर्जेदार पाणी साठवण उपाय नाशिकमधील प्रत्येक कुटुंबाच्या आवाक्यात येतात.

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या विविध योजना; इच्छुकांकडुन कर्ज प्रस्ताव मागविले

छत्रपती संभाजीनगर - संत रोहिदास चर्मोउदयोग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चांभार,मोची,ढोर होलार) इ. व्यक्तींचा शैक्षणिक व सामाजिक विकास होण्यासाठी आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये विविध योजना राबविल्या जाणार आहेत. इच्छुकांकडून कर्ज प्रस्ताव दि.११ जून पर्यंत मागविण्यात आले आहेत.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या ५० टक्के अनुदान योजनेसाठी ५०, बीजभांडवल योजनेसाठी ९५ असे एकूण १४५ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

निकषः- अर्जदार हा चर्मकार (चांभार, मोची, ढोर, व होलार) इ. समाजातील असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष इतके असावे. अर्जदाराने यापुर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदाराने आवश्यकतेनुसार स्वतः अर्जदाराने मुळ कागदपत्रासह उपस्थित राहून कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. त्रयस्थ/ मध्यस्थांमार्फत कर्ज प्रकरणांचे अर्ज देण्यात अथवा स्वीकारण्यात येणार नाही.

आवश्यक कागदपत्रेः- जातीचा दाखला, चालु वर्षाचा उत्पन्नाचा दाखला,रेशन कार्ड,रहिवासी दाखला,मतदान ओळखपत्र, आधारकार्ड,पॅन कार्ड,शैक्षणिक दाखला, तीन फोटो, उद्योग आधार, सीबील क्रेडिट स्कोर (५००च्या पुढे असावा),ज्याठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे त्या जागेचा पुरावा, वीज बील/ टॅक्स पावती /भाडे करारनामा/ भाडे पावती/ जागा वापर संमती पत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा,कागदपत्रे खरी असल्याबाबत लाभार्थ्याचा विनंती अर्ज व ज्या जागी व्यवसाय चालु आहे त्याच जागेचे प्रमाणित छायाचित्र, एक सक्षम जामिनदार (नोकरदार/मालमत्ताधारक/ शेतकरी),जामिनदाराचे हमीपत्र, ग्रामपंचायत, महानगरपालिका अथवा नगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र, व्यवसायासंबंधी तांत्रीक प्रमाणपत्र, अनुभवाचा दाखला, प्रकल्प अहवाल (सीए यांच्या सही शिक्क्यानिशी),खरेदी करावयाच्या साहित्याचे जीएसटी क्रमांक असलेले दरपत्रक,अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र, विहित नमुन्यातील शपथपत्र, विवाहित स्त्री असल्यास लग्नापुर्वीचे व लग्नानंतरच्या दोन्ही नावाची व्यक्ती हि एकच असल्याबाबतचे शपथपत्र, लाभार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक व आधार संलग्न बँक खाते क्रमांक असलेल्या पासबुकची छायांकीत प्रत.

ज्या लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेऊन व्यवसायासाठी कर्ज घ्यावयाचे असेल अशा इच्छुकांनी आपले कर्ज प्रस्ताव दि. ११ जून पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळ मजला, शिवाजी हायस्कूल शेजारी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत. गरजू लाभार्थ्यांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक अरुण सी. राऊत यांनी केले आहे.

# अक्रवीस केमिकल कंपनीत स्फोट; दोन कामगार भाजले



तभा वृत्तसेवा

पैठण दि १२ : पैठण एमआयडीसी परिसरातील अक्रवीस लाइफ सायन्स प्रा. लि. या केमिकल कंपनीत सोमवारी दुपारी ३ वाजता रीअँक्टर फुटल्याची घटना घडली. या दुर्घटनेत कंपनीतील दोन कामगार गंभीररीत्या भाजले. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कंपनीतील उत्पादन प्रक्रियेदरम्यान अचानक री अँक्टरमध्ये स्फोट झाला. यावेळी मोठ्या प्रमाणात केमिकल उडाले. ते कामगार स्वामी कणसे व जगदीश कांबळे यांच्या अंगावर पडले. त्यामुळे दोघेही भाजून जखमी झाले. घटनेनंतर कंपनी प्रशासनाने तत्काळ त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी हलवले. कंपनीचे मालक विजय इंदरगी यांनी जखमींना रुग्णालयात दाखल केल्याचे सांगण्यात येते . या प्रकरणी पोलिस ठाणे एम,आय. डी सी पैठण येथे वैद्यकीय अहवाल (एमएलसी) प्राप्त झालेला नसल्याचे सपोनि ईश्वर जगदाळे यांनी सांगितले. एमएलसी आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, एमआयडीसी परिसरातील काही केमिकल कंपन्यांमध्ये यापूर्वीही अशा प्रकारच्या दुर्घटना घडल्या आहेत. मात्र, तरीही अनेक कंपन्यांमध्ये सुरक्षाविषयक उपाययोजना अपुऱ्या असल्याचा आरोप स्थानिक नागरिक व कामगारांकडून केला जात आहे. केमिकल उद्योगांमध्ये सुरक्षा मानकांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी कामगारांनी केली आहे. या कंपनीमध्ये स्फोट होऊनही आतमध्ये कोणालाही प्रवेश देण्यात आला नाही. त्यामुळे या स्फोटात कंपनीचे किती नुकसान झाले, हे कळू शकले नाही.

कंपन्यांचे कामगार सुरक्षेकडे कायम दुर्लक्ष

पैठण एमआयडीसीमधील अनेक केमिकल कंपन्यांमध्ये कामगारांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. कंपनीमध्ये सुरक्षा यंत्रणा उभारण्याची मागणी येथील कामगार संघटनेच्या वतीने आज करण्यात आली.

# सोयगाव,सिल्लोड,कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय;युरिया, डीएपी व इतर रासायनिक खत पुरवठ्यासाठी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांचे विशेष प्रयत्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ मे

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव,सिल्लोड व कन्नड तालुक्यात खरीप व रब्बी हंगामात युरिया,डीएपी तसेच इतर रासायनिक खतांची टंचाई निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध व्हावे यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करून मागणी लावून धरली होती.

त्यांच्या प्रयत्नांना यश येत विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय,छत्रपती संभाजीनगर यांनी आर.सी. एफ. कंपनीकडे जळगाव येथील रेक पॉईंटवरून खत पुरवठा करण्याबाबत अधिकृत पत्र पाठविले आहे.पत्रानुसार NFL, नर्मदा बायो केम तसेच IPL कंपनीमार्फत येणाऱ्या खत रेकमधून सुमारे ३०० मेट्रिक टन खत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.पूर्वी छत्रपती संभाजीनगर येथून खत पुरवठा होत असल्याने सोयगाव,सिल्लोड व कन्नड तालुक्यातील गावांपर्यंत खत पोहोचण्यास विलंब होत होता.त्यामुळे अनेक वेळा शेतकऱ्यांना खतासाठी भटकंती करावी लागत होती.आता जळगाव येथून थेट पुरवठा झाल्यास युरिया, डीएपी व इतर रासायनिक खते वेळेवर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.या कामासाठी जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याची माहिती पुष्पाताई प्रकाश काळे यांनी दिली.शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# शेतकरी महिला घेणार स्वामींची परीक्षा - "देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची"

छत्रपती संभाजीनगर - श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील युद्धाने आजवर अनेक वळणे घेतली आहेत. मात्र, जेव्हा एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? याच उत्कंठावर्धक विषयावर आधारित 'वटवृक्ष एंटरटेनमेंट' निर्मित बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित "देऊळ बंद २" हा चित्रपट २१ मे रोजी प्रदर्शित होत आहे.

चित्रपटाचा टिझर नुकताच श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. काही तासातच तुफान व्हायरल झालेल्या टीझरने स्वामी भक्तांच्या आणि रसिकांच्या मनात चित्रपटाची उत्सुकता अजूनच वाढली आणि सर्वांनी "देऊळ बंद २" आम्ही चित्रपटगृहात जाऊन नक्की बघणार अशी ग्वाही विविध माध्यमातून दिली.

"देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची" च्या टीझरमध्ये स्वामी म्हणतात "अगं ए नास्तिके प्रत्येक युगात तुझ्या सारखे कित्येक रावण आणि कित्येक दुर्योधन पाहिलेत मी देवाची परीक्षा पाहणारे" त्यावर शेतकरी महिला म्हणते "लिहून देते, कधी शेतकरी नसल पाहिला." त्यांच्या या संवादावरून "देऊळ बंद २" मध्ये आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक गरीब शेतकरी महिला देवाची सुद्धा परीक्षा घेऊ शकते हे स्पष्ट होत आहे. नदीकाठचा निसर्गरम्य परिसर, भव्य वडाचे झाड आणि एका बाजूला स्वामींची जरब तर दुसऱ्या बाजूला एका सामान्य स्त्रीचे धैर्य, असा हा सामना खिळवून ठेवणारा आहे.

आता या परीक्षेत स्वामी कोणत्या प्रश्नांना समोरे जाणार आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या समस्यांचे निवारण करणार? हे बघण्यासाठी प्रेक्षकांना २१ मे पर्यंत वाट बघावी लागणार आहे.

# विविध कलाविष्कारांच्या सादरीकरणातून चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने

## कलारंग उन्हाळी शिबिराचा उत्साहात समारोप



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा : सिडको परिसरातील 'कलारंग' उन्हाळी शिबिराचा समारोप विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणाने उत्साहात पार पडला. शिबिरातील चिमुकल्या बालकलाकारांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. 'मी होणार सुपरस्टार' फेम निषाद देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात ईश्वरी गोगटे हिच्या मंगलमय गणेश वंदनेने झाली. त्यानंतर ईश्वरी, ऋजुता आणि अधिरा यांनी सादर केलेल्या कविता गायनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. छोट्या जयेशने गोष्ट सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले, तर शौनक आणि अभिदा यांनी सादर केलेल्या नाट्यछटांनी उपस्थितांची वाहवा मिळवली. याशिवाय प्रार्थना, गीत आणि नृत्याचे सामूहिक सादरीकरणही विशेष आकर्षण ठरले.

'हरिनामाची शाळा भरली...' या समूह भक्तीगीतावर बालकलाकारांनी सादर केलेल्या सुरेल आणि मनमोहक प्रस्तुतीमुळे उपस्थितांनी आपसूकच ठेका धरला. बालकलाकारांच्या विविध कलाविष्कारांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. विनोद सिनकर, सुधीर कोर्टीकर आणि डॉ. शेषराव पठाडे यांनी शिबिरार्थींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. बालकलाकारांना संस्कार, आत्मविश्वास आणि कला जोपासनेचे महत्त्व पटवून देत त्यांच्या सादरीकरणाचे मुक्तकंठाने कौतुक केले. तसेच भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सारिका कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन वैशाली जोशी यांनी, तर आभार प्रदर्शन रेणुका मोहरीकर यांनी मानले. कार्यक्रमाचे व्यवस्थापन प्रसाद जोशी यांनी पाहिले.

# अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी जनजागृती व प्रत्यक्ष कारवाईवर भर द्या- जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर - जिल्ह्यात अंमलीपदार्थांना प्रतिबंध करण्यासाठी लक्षीत गटांमध्ये जनजागृती व प्रत्यक्ष कायदेशीर कारवाई वर भर द्या,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले. अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आज पार पडली. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीचे विभागीय अधिकारी भामरे, अंमली पदार्थ विरोधी कृती दलाचे पोलीस निरीक्स्हक सचिन काळे, उपअधीक्षक गृह लोहमार्ग पोलीस संजय लोकहरे, डॉ. महेश लड्डा, उपविभागीय अधिकारी सिल्लोड पठाण तसेच अन्य अधिकारी आदी उपस्थित होते.

अंमली पदार्थाच्या विळख्यात प्रामुख्याने तरुण, विद्यार्थी वर्ग सापडतो. त्यांचे प्रबोधन करता यावे यासाठी शिक्षण विभाग, शाळा महाविद्यालये, पोलीस, आरोग्य विभागाने संयुक्त अभियान राबवावे. याच अभियानाला रस्ता सुरक्षेशी जोडावे. नशामुक्ती अभियान राबविण्यासाठी पूर्ण शैक्षणिक वर्षात कार्यक्रमांचे नियोजन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.तालुकास्तरीय यंत्रणांमार्फत विशेष पथके कार्यान्वित करुन गांजा शेतीविरोधात अभियान राबविण्याचेही निर्देश त्यांनी दिले. तसेच औषध विक्री दुकानांवर विशेष लक्ष ठेवून त्यांच्यामार्फत प्रतिबंधीत औषधांची विक्री, डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधांची विक्री आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करावी,असे निर्देशही जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

# जिल्हानियोजन समितीची शुक्रवारी बैठक

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा नियोजन समितीची बैठक येत्या शुक्रवारी दि.१५ रोजी दुपारी १२ वा. जिल्हा नियोजन समिती सभागृह,जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजीत करण्यात आली आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण), अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत सन २०२५-२६ मार्च अखेर झालेल्या खर्चास मान्यता देणे,सन २०२६-२७ करीता एप्रिल २०२६ अखेर झालेल्या खर्चाचा आढावा घेणे इ. विषयांवर या सभेत कामकाज होणार आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव विनय गौडा जी.सी. यांनी कळविले आहे.

# जमीन मोजणीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी परवानाधारक ३० भूमापकांची नियुक्ती करण्यास मान्यता

छत्रपती संभाजीनगर - भूमि अभिलेख विभागामार्फत करावयाच्या जमीन मोजणीसाठी आता अभिकरणामार्फत ३० परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यास मान्यता मिळाली असून यासंदर्भातील निविदा सुचना https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली आहे,असे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख डॉ.विजय वीर यांनी कळविले आहे. मर्यादीत मनुष्यबळामुळे मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहू नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून अभिकरणामार्फत ३० परवानाधारक भूमापकांची निवड करण्यात येणार आहे,असेही डॉ. वीर यांनी कळविले आहे. दोन वर्षाच्या कालावधीसाठी ही नियुक्ती असेल असेही यानिविदेत स्पष्ट करण्यात आले आहे. या निविदा ई-निविदा पद्धतीने दि.१९ मे पर्यंत मागविण्यात आल्या आहेत. दि.२१ रोजी या निविदा उघडण्यात येणार आहेत. निविदेच्या इतर अटी व शर्ती संकेतस्थळावर पाहता येतील.

# एमजीएमच्या प्रा. अर्चना तेलगावकर यांना पीएचडी प्रदान



छत्रपती संभाजीनगर, दि.१२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रा.अर्चना तेलगावकर यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.अर्चना तेलगावकर यांनी कॉम्प्युटर सायन्स इंजिनियरिंग या विषयात ' कार्डिॲक डिसीज डिटेक्शन यूजिंग एआयओटी' या विषयावर आपले संशोधन केले आहे. त्यांनी एमजीएम विद्यापीठातून डॉ.जयश्री पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली आपली पीएचडी पूर्ण केली आहे. प्रा.अर्चना तेलगावकर यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे व सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जटवाडा येथे आचार्य पुलक सागरजी गुरुदेव यांच्या 56 व्या जन्मोत्सवानिमित्त "पुलक महाप्रसादी"चे आयोजन शनि अमावस्या निमित्त होनार अभिषेक





छत्रपती सभाजीनगर शहरापासुन 12 कि.मी.अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.1008 संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे शनिअमावस्येच्या पावन पर्वानिमित्त दि. १६ मे २०२६, शनिवार रोजी अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे पूज्य आचार्य श्री १०८ पुलक सागरजी गुरुदेव यांच्या ५६ व्या जन्मोत्सवानिमित्त भव्य "पुलक महाप्रसादी" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे

या धार्मिक सोहळ्यानिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून समाजातील सर्व धर्मप्रेमी बांधवांनी आपल्या संपूर्ण परिवारासह उपस्थित राहून धर्मलाभ व महाप्रसादीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमात विविध धार्मिक विधी, महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शनिअमावस्येच्या पवित्र दिवशी आयोजित या सोहळ्यामुळे जटवाडा परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते

## शुध्दीपत्रक

वसमत नगर परिषद कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा सुचना (जा.क्र. कावि/बांधकाम/1851/2026 दि.08/05/2026) मधील कामांच्या तक्त्यामध्ये टंकलेखन दोषामुळे तांत्रिक चूक झाली आहे. दलितेत्तर योजना साल सन 2025-2026 अंतर्गत कामांच्या माहितीमध्ये 'कोरी निविदा रक्कम' व 'कामाची मुदत' या रकान्यांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत असून संबंधित कंत्राटदारांनी याची नोंद घ्यावी.

तक्त्यातील 'कोरी निविदा रक्कम' या रकान्यात नमूद केलेली रक्कम ही चुकीची असून सर्व कामांसाठी 'कोरी निविदा रक्कम' प्रत्येकी रु. 800/- अशी वाचण्यात यावी.

तसेच 'कामाची मुदत' या रकान्यात नमूद केलेली माहिती बदलून ती सर्व कामांसाठी '100 दिवस' अशी वाचण्यात यावी.

मूळ निविदेतील इतर सर्व अटी, शर्ती व कामाचे स्वरूप कायम राहील.

मुख्याधिकारी
नगरपरिषद, वसमत

## संक्षिप्त वृत्त...

### रिध्दी काबरा हिचे घवघवीत यश



RIDDHI KABRA 16/04/2010

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर नुकत्याच झालेल्या शालांत परीक्षेच्या सी बी एस ई बोर्डाचा निकाल लागला असून यात शहरातील न्यू ईरा इंग्लिश स्कूल मध्ये सीबीएससी बोर्डातून शिक्षण घेणाऱ्या रिद्धी सुनील काबराहिने शालांत परीक्षेत ९६ टक्के गुण घेत शाळेतून द्वितीय येण्याचा बहुमान पटकावला या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष कृपा चौधरी माजी सरपंच सुभाष चंद्र काबरा सुनील काबरा सुजित काबरा सुशील काबरा यांनी कौतुक केले आहे.

### सावरगाव तांड्यात शेतातील आखाड्याला भीषण आग; दीड लाखांचे नुकसान

#### महिला शेतकरी संगीता राठोड यांचे तीन स्प्रिंकलर सेट जळून खाक



**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील सावरगाव तांडा येथील गट क्रमांक १२७ मधील महिला शेतकरी संगीता संजय राठोड यांच्या शेतातील आखाड्याला सोमवारी दुपारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत तीन स्प्रिंकलर सेट पूर्णपणे जळून खाक झाले असून आंबा व नारळाची काही झाडेदेखील आगीत भस्मसात झाली आहेत. या घटनेत जवळपास दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने शेतातील साहित्य व झाडांचे मोठे नुकसान झाले. नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

या घटनेमुळे महिला शेतकरी संगीता राठोड यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. शासनाने पंचनामा करून तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी संगीता राठोड यांनी केली आहे.

# गोदामाईचे वस्त्रहरण कधी थांबणार?

## प्रशासनाची दुटप्पी भूमिका कृष्णाची की धृतराष्ट्राची?, लासीना,वांगी गोदापात्र पोकलेन मशीनने वाळू उपसा

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:-** सध्या सोनपेठ शहरालगत असलेल्या गोदामाईचे दुर्योधन आणि दु:शासन रुपी रेती तस्करांनी वस्त्रहरण सुरू केले असून याकडे प्रशासनातील अधिकारी धृतराष्ट्रासारखे अंध होऊन गांधारी सारखी डोळ्यावर पट्टी बांधून बसले आहेत. तर भीष्म पितामह द्रोणाचार्य आणि विदुर यासारखे जेष्ठ अधिकारी व कर्मचारी बघ्याची भूमिका घेत आहेत. अशावेळी गोदामाईचे वाळूरुपी वस्त्रहरण थांबवण्यासाठी कृष्णाच्या भूमिकेत पुढे येणार तरी कोण? याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. सोनपेठ तालुक्याला सुंदर असा गोदामाईचा किणारा लाभला आहे. वाणी संगम, दुधगाव, विटा, वाघलगांव, लासीना, वाडी पिंपळगाव, थडिपिंपळगाव, थडी उक्कडगांव, शिरसी बु, शिरोरी, लोही ग्राम, खडका, कानेगाव आदी गावे गोदाकाठावर वसलेली आहेत. त्यामुळे या गावातील शेतकऱ्यांच्या शेतीच्या सिंचनाची मोठ्या प्रमाणात सोय गोदावरीच्या पाण्याने होते. परिणामी परिसरातील सुपीक व सोन्याच्या भावात विकणारी शेती बारमाही हिरवा शालू नेसून सोनपेठ तालुक्याचे वैभव वाढवताना दिसून येत आहे. या गावातील शेतकऱ्यांचे मुख्य व नगदीचे पीक म्हणून ऊस कापूस हरभरा सोयाबीन याकडे पाहिले जाते. निसर्गाचा लहरीपणा आलाच तर अतीवृष्टीने आलेल्या पुरामुळे गोदाकाठच्या शेतीमध्ये पाणी साचून मोठ्या प्रमाणात नुकसानही होते. परंतु गोदामाईच्या संत वाहणाऱ्या पाण्यावर ऊस व रब्बीच्या पिकांसाठी होणारा मोठ्या प्रमाणात फायदा हा गोदाकाठच्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरतो. तसेच परिसरातील गावांची तहान भागवण्यासाठी सुद्धा गोदामाई तत्पर असते. त्यामुळे गोदामाई ही सोनपेठ तालुक्याची जिवन वाहिनी संबोधली जाते. परंतू सध्या परिस्थितीत या गोदामाईचे रेती तस्करांनी वस्त्रहरण सुरू केले आहे.याकडे जिल्हा प्रशासनाने त्वरित लक्ष नाही दिले तर गोदावरीचा मोठा ऱ्हास होऊन भविष्यात गोदाकाठच्या गावांना प्रदुषण व पाणीटंचाईचा सामना करावा लागेल.




असा होतो रेती घाटाचा लिलाव प्रत्येक वर्षी सोनपेठ तालुक्यातील लासीना, विटा,वाडी पिंपळगाव,थडी पिंपळगांव,खडका ,मोहळा,कानेगाव,शिरोरी,पोहंडुळ ,हाटकरवाडी या रेती उत्खननाच्या यादीतील गावांपैकी काही गावांचा गोदापात्रातून रेती उत्खननासाठी प्रत्येक वर्षी महसूल प्रशासनाकडून टेंडर पद्धतीने ठेका पुकारला जातो. ऑनलाइन पद्धतीने बोली लावली जाते. ज्याची सर्वाधिक बोली असेल त्याला प्रशासनाकडून रेती उपशाचे टेंडर दिले जाते. टेंडर धारकाला गोदावरी पात्रात मोजणी द्वारे खुणा करून दिल्या जातात व टेंडरची रक्कम भरल्यानंतर स्थानिक तहसील प्रशासनाकडून ताबा पावती दिली जाते. रेती उत्खननासाठी ठरल्याप्रमाणे ब्रास मध्ये मर्यादा घालून दिली जाते तर सर्व नियम व अटी शर्तीच्या अधीन राहून अंतिम परवानगी घेऊन टेंडर धारक रेती उत्खननाला सुरुवात करतात. त्यातून कोट्यावधी रुपयांचा महसूलही सरकारलाही मिळतो. परंतु सध्या गोदापात्रात तस्करी करून रेती उत्खनन करणे आता नित्याचेच झाले आहे. अधिकृत रेती घाटाच्या नावाखाली अनाधिकृत रेतीचा उपसा करण्याचा गोरख धंदा सध्या टेंडर धारक करत आहेत. त्यामुळे महसूल प्रशासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडवून वाळूची चोरटी वाहतूक सुरू आहे.

सोनपेठ तालुक्यातील लासीना, थडी पिंपळगांव, पोलीस स्टेशन हद्दीतील महातपुरी व तालुका शेजारच्या वांगी या गावच्या गोदापात्रातून सध्या अधिकृत रेती घाटाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात अनाधिकृत रेतीचा उपसा सुरू आहे. चुकीच्या ठिकाणी होतेय वाळूचे उत्खनन नियमानुसार महसूल प्रशासनाने सोनपेठ तालुक्यातील लासीना, थडीपिंपळगाव व खडका-मोहळा या ठिकाणचे वाळूघाट लिलाव पद्धतीने विक्री केले आहेत. परंतु लासीना या ठिकाणचा रेती उपसा गोदावरीच्या दुसऱ्या बाजूने म्हणजेच पाथरी तालुक्यातील कुंभारी येथून केला जात आहे. त्यामुळे लासीन व कुंभारी या दोन्ही गावच्या गोदावरी मधून मोठ्या प्रमाणात वाळूचे उत्खनन सुरू आहे. तसेच थडी पिंपळगाव येथील रेतीचे उत्खनन गोदापात्राच्या दोन्ही बाजूने म्हणजेच गोदावरीच्या पैल तिरावरुन सुद्धा सुरू आहे. असे केले जाते वाळूचे उत्खनन महसूल नियमानुसार ठेकेदारास गोदापात्रात मजुरां मार्फत वाळूचे उत्खनन करून लहान वाहनातून सदरची वाळू गोदा पात्राच्या बाहेर एक किलोमीटरच्या पुढे वाहून नेली जाते व तेथून मशीनच्या सहाय्याने इतर वाहनां मधून भरून दिली जाते. परंतु तसे न होता सध्या या सर्वच अधिकृत रेती घाटाचे ठिकाणी गोदापात्रात मोठ मोठ्या पोकलेन मशीन उतरवल्या आहेत. त्या मशीनद्वारे रात्रंदिवस रेतीचे उत्खनन करून गोदापात्रातूनच हायवा टिप्पर मध्ये भरून वाळू बाहेर काढली जात आहे त्यामुळे गोदावरीच्या प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला असून गोदावरीचा ऱ्हास होत चालला आहे. तसेच गोदावरी मध्ये पोकलाईन मशीनच्या साह्याने उत्खन केल्याने मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून गोदापात्रातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे सदरच्या गावांना भविष्यात पाणी प्रश्न भेडसावण्याची परिस्थिती नाकारता येत नाही. यासाठी प्रशासनाने त्वरित दखल घेऊन सदरील सुरू असलेला अवैद्य वाळूचा उपसा थांबवण्याची गरज आहे. जिल्हा प्रशासनाकडून नोटीस संबंधित नियमबाह्य रेती उत्खनन करणाऱ्या टेंडर धारक संस्था व नागरिकांना जिल्हाधिकारी यांनी नुकतीच नोटीस बजावल्याचे बोलले जात असून, यासंदर्भात नियमबाह्य रेती उत्खनन व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांची पायमल्ली केल्या संदर्भात प्रशासनाने तात्काळ खुलासा मागितला आहे. यावरून संबंधित टेंडरधारक या नोटीसीला काय उत्तर देणार? तसेच जिल्हा प्रशासन यावर कुठल्या प्रकारचे निर्बंध लावून या अवैद्य रेती उत्खनन विरोधात काय कारवाई करणार? खरोखरच कृष्णाच्या भूमिकेत येऊन जिल्हाधिकारी गोदामाईचे सुरु असलेले वस्त्रहरण थांबवणार की धृतराष्ट्र सारखे अंध होऊन दुटप्पी भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. अन्यथा संत वाहणाऱ्या गोदामाईच्या सर्व शरीरावर पोकलाईन मशीनद्वारे ओरबडलेल्या ईजा, भविष्यात गोदामाईच्या कुशीत वसलेल्या गावांसाठी हानिकारक ठरू नयेत हे विशेष.

### जिंतूर-औंढा रोडवरील वेगवेगळया दोन अपघातातील पाचजण गंभीर जखमी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर औंढा महामार्ग रस्त्यावरील आडगाव बाजार फाट्याच्या समोर टोलनाक्याजवळ कार दुचाकी अपघातात चार जण गंभीर जख्मी झाले तर येलदरी रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एक दुचाकीस्वार गंभीर जख्मी झाल्याच्या दोन घटना ९ में रात्री ७ ते ८ च्या सुमारास घडली आहे.

जिंतूर औंढा महामार्ग रस्त्यावरील आडगाव बाजार फाट्याच्या रस्त्यावर कार दुचाकी अपघातात चार जण गंभीर जख्मी गजानन श्रीराम घुले वय ३० वर्षे रुक्मिणी श्रीराम घुले वय २५ वर्षे पुनम रामदास घुले वय ०४ वर्षे अर्चना रामदास घुले वय २५ वर्षे हे सर्व राहणार येळी तालुका औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली तर दुसरा आपघात जिंतूर येलदरी रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार गोपाळ नवनाथ डाखोरे वय २० वर्षे सर्व अपघातग्रस्तांना घटनास्थळावरून जखमी अवस्थेत त्यांना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ मोहीनी श्रृंगारे यांनी प्राथमिक उपचार करून सर्व चौघांना परभणी जिल्हा रुग्णालयात तर एकास संभाजीनगर रुग्णालयात हलविण्यात आले आहे घटनास्थळी व रुग्णालयात नागेश आकात यांनी परिश्रम घेतले होते बातमी देईपर्यंत पोलीस ठाण्यात कोणतीही नोंद झालेली नाही.

### ओखा-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस नियमित; महाराष्ट्रासह चार राज्यांना थेट रेल्वे जोडणी

**परभणी,/प्रतिनिधी :** पश्चिम रेल्वेकडून सध्या धावणारी गाडी क्रमांक ०९५२०/०९५१९ ओखा-मदुराई-ओखा विशेष साप्ताहिक रेल्वे आता नियमित करण्यात आली असून ती पुढे गाडी क्रमांक १९५६०/१९५५९ ओखा-तिरुपती-ओखा साप्ताहिक एक्सप्रेस म्हणून धावणार आहे. या निर्णयामुळे गुजरात, महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक सुलभ व नियमित रेल्वे सेवा उपलब्ध होणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १९५६० ओखा-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस ११ मे २०२६ पासून दर सोमवारी ओखा येथून रात्री ११.३५ वाजता सुटणार आहे. ही गाडी द्वारका, जामनगर, राजकोट, अहमदाबाद, आनंद, वडोदरा, नंदुरबार, जळगाव, भुसावळ, अकोला, वाशिम, हिंगोली, बसमत, पूर्णा, नांदेड, बासर, निजामाबाद, काचेगुडा, गडवाल, कर्नुल सिटी आणि ढोणे मार्गे तिरुपती येथे बुधवारी रात्री ११.३० वाजता पोहोचेल.

### जिंतूर तालुक्यातील ग्रामविकासकामांचे मूल्यांकन; २८ ग्रा.पं.ची पाहणी

**जिंतूर,/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज - अभियान अंतर्गत तालुक्यातील २८ ग्रामपंचायतींची पाहणी - आणि गुणांकन करण्यासाठी जिल्हा परिषद नंदुरबार येथील धडगाव पंचायत समिती या ठिकाणचे पथक आले आहे. - विविध ग्रामपंचायत - व गावांना भेटी - देऊन पथकाकडून विकासकामे आणि स्वच्छता, वृक्षलागवड, - विशेष नावीन्यपूर्ण आदी कामांची पाहणी केली जात आहे, त्यानंतर गुणांकन केले जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर २५ ते ३१ - मार्च २०२६ पर्यंत ग्रामपंचायत स्तरावर



अनेक प्रकारचे - नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून या उपक्रमांमधून शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत, पाणीपुरवठा, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, व्यायाम शाळा, धार्मिक स्थळ, आरोग्य अभियान, घरकुल योजना, पाणंद रस्ते, अंतर्गत रस्ते यासह अनेक विकासकामांचे व राबविलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करून गुणांकन दिले जाणार आहे. बक्षिसासाठी निवड तालुकास्तरावरती त्याचप्रमाणे जिल्हास्तर, विभागस्तर आणि राज्यस्तर अशी वेगवेगळी प्रथम पारितोषिक पाच कोटी, तीन कोटी व दोन कोटी रुपयांची पारितोषिकही देण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर पहिलं बक्षीस १५ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक १२ लाख रुपये, तिसरे पारितोषिक १० लाख रुपये व प्रत्येकी विशेष दोन पारितोषिके तालुकास्तरावर प्रत्येकी रुपये पाच लाख असे मिळणार आहेत.

## के.के.एम. महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**परभणी,/प्रतिनिधी:**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, मानवत संचलित तिन्ही विद्यालयांनी आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. शनिवार, दि. ९ रोजी येथील के.के.एम. महाविद्यालयाच्या कै. पन्नालालजी चांडक सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयकुमारजी कत्रुवार हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव बालकिशनजी चांडक, सहसचिव विजयकुमारजी दलाल, पाथरी तालुका शिक्षण प्रसा संचालक मा. श्री. दिलीपरावजी हिबारे, मा. श्री. संजयकुमारजी लड्डा, अजिंक्यजी नखाते तसेच, नागनाथ कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयांचा निकाल व गुणवंत विद्यार्थी:



१) सौ. रामकंवर द्वारकादास लड्डा सेमी विद्यालय, मानवत (निकाल १००%): या विद्यालयाने १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. प्रविष्ट २९ पैकी २९ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविन्याने उत्तीर्ण विद्यार्थी -१८ प्रथम श्रेणीत - ०४ द्वितीय श्रेणीत - ०६ पास श्रेणी - ०१ गुणानुक्रमे : प्रथम: जानकी निलेशकुमारजी लड्डा (९९.२०%) द्वितीय: प्रथमेश माणिकराव भालसत्रे (९३.००%) तृतीय: धनश्री भगवानराव होगे (९२.८०%)

२) कै. स. गो. नखाते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, देवनांद्रा (निकाल ९१.५६%): ग्रामीण भागातील या विद्यालयातील ३१५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. परीक्षेसाठी नोंदवलेले परीक्षार्थी :-३४८ परीक्षेसाठी प्रविष्ट विद्यार्थी :-३४४ विशेष प्राविण्याने उत्तीर्ण श्रेणीमध्ये :-९१ प्रथम श्रेणी मध्ये पास: ८९ द्वितीय श्रेणी मध्ये पास ९३ पास श्रेणीमध्ये उत्तीर्ण :-४२ एकूण उत्तीर्ण परीक्षार्थी संख्या :- ३१५ प्रथम (विभागून): कु. अक्षरा संतोष कुसळे (९६.४०%) व चि. स्वराज रतन थोरे (९६.४०%) द्वितीय : कु. दिव्या रमेशराव गोडबोले (९५.२०%) तृतीय (विभागून): कु. सिद्धी महादेव काळे (९३.६०%) व कु. श्रावणी गणेश शिंदे (९३.६०%)

३) श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रूवार विद्यालय, मानवत (निकाल ९४.८५%): परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थी - २७२ उत्तीर्ण विद्यार्थी -२५८ विशेषप्राविण्य श्रेणीत-८३ प्रथम श्रेणीत -८६, द्वितीय श्रेणीत -६५ उत्तीर्ण श्रेणीत -२४ प्रथम (विभागून): गौरी गोविंद पौळ (९४.४०%) व चि. शुभम कैलास पूकाणे (९४.४०%) द्वितीय (विभागून): चि. ओम दामोदर देंडगे (९३.२०%) व कु. शारदा शंकर वावरे (९३.२०%) तृतीय : कु. सेजल राजू कच्छवे (९३.००%) यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक भाऊसाहेब होगे, पुंडलिक कजेवाड व विश्वभूषण इंगोले यांनी आपल्या विद्यालयाच्या निकालाचा आढावा सादर केला. बालकिशनजी चांडक , संजयकुमारजी लड्डा, विजयकुमारजी दलाल यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत अभिनंदन केले. सूत्रसंचालन रामेश्वर वाघमारे यांनी केले. ज्ञानेश्वर पांचाळ व रामेश्वर गायकवाड यांनी त्यांना सहकार्य केले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापक श्री विश्वभूषण इंगोले यांनी केले. या सोहळ्यासाठी पर्यवेक्षक एम.डी केकान, तिन्ही विद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मोठ्या संख्येने पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### जिंतूरच्या वकील संघाच्या पाठपुराव्यास यश




**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापने संदर्भात जिंतूर वकील संघाकडून गेल्या काही वर्षांपासून मागणी करण्यात येत होती. या मागणीस व पाठपुराव्यास यश आले असून परभणीचे जिल्हाधिकारी यांनी सदर न्यायालयासाठी जिंतूरच्या तहसील कार्यालयातील दुय्यम निबंधक कार्यालयाची नविन इमारत मध्ये तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करून देण्याचे आदेश संबंधित तहसील कार्याला दिले आहे. परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांनी महाप्रबंधक मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे जिंतूर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयन व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापनेसंदर्भात लेखी मागणी केली यावरून सदर न्यायालयसंबंधी जिंतूर वकील संघाच्या पदअधिकारी यांची मा.जिल्हाधिकारी परभणी यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली यामध्ये जिंतूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड .आर.बी.देशमुख उपाध्यक्ष ॲड पी .वाय. देशमुख सचिव ॲड व्ही.व्ही घनसांवध सहसचिव डी आर वाकळे अड विजयराव देशमुख माजी बार कौन्सिल उपअध्याक्ष हे उपस्थित होते. या सर्व मागणी व सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे जिंतूर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे .

## परभणीतील त्या बंद पडलेल्या सिग्नल यंत्रणा तातडीने कार्यान्वित करा : विजयकुमार मुंदडा अपघात प्रकरणी 'हिट अँड रन'चा गुन्हा दाखल करा - पत्रकारांची मागणी

**परभणी ,/प्रतिनिधी:** बंद पडलेली सिग्नल यंत्रणा तातडीने कार्यान्वित करा : विजयकुमार मुंदडा अपघात प्रकरणी 'हिट अँड रन'चा गुन्हा दाखल करा - पत्रकारांची मागणी करण्यात आली आहे.

परभणी परभणी शहरातील बंद पडलेली सिग्नल यंत्रणा तातडीने कार्यान्वित करून अपघातमुक्त वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यात यावी, तसेच ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार मुंदडा यांच्या अपघाती मृत्यूची जलदगतीने तपासणी करावी, अशी मागणी पत्रकार संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे.

प्राचार्य सुरेश नाईकवाडे, विशाल माने, कैलास चव्हाण, विजय कुलकर्णी, लक्ष्मीकांत रासवे, शिवशंकर सोनुने, राजकुमार हट्टेकर, दत्तात्रय कराळे, डॉ. धनाजी चव्हाण, ज्ञानेश्वर उंडाळ, नरहरी चौधरी, लक्ष्मण मानोलीकर, अरुण रणखांबे, विशाल मुंदडा आदी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि. ११ मे) पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आणि महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांची भेट घेऊन आपल्या मागणी संदर्भातील निवेदन सादर केले. त्याद्वारे, मागील अनेक महिन्यांपासून शहरातील सिग्नल यंत्रणा पूर्णपणे बंद असल्याने वाहतूक नियंत्रणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः वसमत रोडवर सातत्याने अपघात होत असून त्यावर नियंत्रण आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. याशिवाय शहरातील प्रमुख रस्त्यांवर 'प्रतिबंधित झोन' निर्माण करणे, भाजी व फळ मार्केटसाठी स्वतंत्र झोन तयार करणे, अनधिकृत पार्किंग, रस्त्यालगत वाहन दुरुस्ती व अतिक्रमणांवर कारवाई करणे गरजेचे असून या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्यात समन्वय असणे महत्वाचे आहे, असेही या निवेदनात म्हटले.

तसेच वसमत रोडवरील श्री शिवाजी महाविद्यालय, तलाठी कार्यालय, शिवशक्ती बसस्टॉप, कृषी विद्यापीठ गेट, खानापूर फाटा, कारेगाव फाटा, श्री दत्त नाम मंदिर, अबोला फाटा आणि चौपाल महिला वस्तीगृह परिसरात गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शहरातील प्रमुख मार्गांवरील सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करणे, अतिक्रमणे हटविणे, वाहतूक सिग्नल सुरू करणे आणि तलाठी कार्यालय परिसरातील खासगी ट्रॅव्हल्स बसेसना मनाई करण्याची मागणीही करण्यात आली.

दरम्यान, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी सकारात्मक भूमिका घेत महापालिका प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढला जाईल, असे आश्वासन दिले.

अपघात प्रकरणी 'हिट अँड रन'चा गुन्हा दाखल करा...

५ मे रोजी वसमत रोडवरील श्री शिवाजी विधी महाविद्यालयासमोरील गोल्डन बेकरी परिसरात भरधाव दुचाकीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात विजयकुमार मुंदडा यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असला तरी तपास योग्य पद्धतीने होत नसल्याची खंत पत्रकारांनी व्यक्त केली. या प्रकरणात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(२) अंतर्गत 'हिट अँड रन'चा गुन्हा दाखल करून आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करून भरधाव आणि निष्काळजी वाहनचालकांवर निर्बंध लावावेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत

## अग्रलेख...

# कसोटीचा काळ!

भारतीय मानसिकतेविषयी अनेक वाद-प्रवाद आहेत. भारतीय माणूस आळशी असतो. शेजाऱ्याच्या घराला आग लागली तरी ती स्वतःच्या दाराशी येईपर्यंत तो शांत राहतो, असे म्हटले जाते. अलिकडच्या काळात ही समजूत पुसली जाऊ लागली असली, तरी त्या मानसिकतेचे काही अवशेष मात्र अधूनमधून डोके वर काढत असतात. इतिहासकाळापासून भारतीय समाज वेगवेगळ्या समस्यांना, संकटांना तोंड देत आला आहे. परकीय आक्रमणे, दुष्काळ, गरिबी, भ्रष्टाचार, नोकरशाहीचा त्रास, या सर्वांसोबत जगताना 'हे असेच चालायचे' ही वृत्ती तयार झाली. त्यामुळे कोणतीही परिस्थिती तातडीने बदलण्याची अपेक्षा ठेवू नये अशी मानसिकता तयार होत गेली आणि कोणतीही परिस्थिती कायम राहात नसल्याने, ती बदलून पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येईल असा विश्वासही रुजत गेला. बहुधा राजकीय व्यवस्थेलाही जनतेच्या या सहनशीलतेची सवय लागली असावी.

पण या समजुतीची दुसरी बाजूही महत्त्वाची आहे आणि अलिकडे ही दुसरी बाजू भक्कमपणे मांडली जाऊ लागली आहे. यामुळे भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेचा विश्वास वाढला. आपल्या ताकदीच्या जाणिवाही जाग्या होत गेल्या. भारतीय समाज पूर्णपणे निष्क्रिय असता, तर स्वातंत्र्यलढा घडला नसता; आणिबाणीविरोधी लाट उभी राहिली नसती; भ्रष्टाचारविरोधी आंदोलने, शेतकरी आंदोलन किंवा विविध सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या नसत्या आणि दहशतवादी कारवाया करणाऱ्यांना त्यांच्या घरात घुसून धडा शिकविण्याची हिंमतदेखील जमा झाली नसती. भारतीय समाज दीर्घकाळ शांत राहतो; पण जेव्हा त्याला प्रश्न अस्तित्वाचा वाटू लागतो, तेव्हा तो मोठा राजकीय बदल घडवू शकतो. कोणतीही समस्या, संकट, स्वतःच्या दारापर्यंत येऊन दाखल होईपर्यंत स्वस्थ राहिले, तर तोपर्यंत कदाचित खूप उशीर झालेला असतो, याची जाणीव आता समाजात रुजू लागली आहे. भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशवासीयांना 'आठवड्यातून एक वेळ उपवास करा' किंवा 'एका वेळचे जेवण कमी करा' असे आवाहन १९६५ च्या सुमारास केले होते. त्या काळातील गंभीर अन्नटंचाईशी सामना करण्यासाठी केलेले ते राष्ट्रीय शिस्तीचे आवाहन होते. भारत-पाकिस्तान युद्धामुळे आर्थिक ताण वाढला होता. अमेरिकेकडून 'पीएल-४८०' योजनेअंतर्गत मिळणारा धान्यपुरवठा अनिश्चित झाला आणि देशात अन्नसुरक्षेचा प्रश्न तीव्र झाला. या परिस्थितीत लालबहादूर शास्त्री यांनी देशवासीयांना स्वयंस्फूर्तीने त्याग करण्याचे आवाहन केले. देश अडचणीत असताना प्रत्येक नागरिकाने थोडा त्याग केला पाहिजे, ही त्यामागची भावना होती. या आवाहनाला देशभरातून उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला. अनेक घरांमध्ये सोमवारचा रात्रीचा स्वयंपाक बंद ठेवला जाऊ लागला. हॉटेल्स, उपाहारगृहे आणि भोजनालयांनीही काही वेळ बंद ठेवण्यास सुरुवात केली. लोकांनी उपवास, अल्पाहार किंवा साधे जेवण स्वीकारले आणि देशभक्ती, सामूहिक जबाबदारी आणि नेतृत्वावरचा विश्वास यांचा प्रभाव समाजमनावर स्पष्ट दिसून आला. या संकटातूनच पुढे भारताने अन्न स्वावलंबनाचा मार्ग अधिक गांभीर्याने स्वीकारला. उच्च दर्जाची बियाणी, सिंचन, रासायनिक खते आणि आधुनिक शेतीपद्धती यांच्या साहाय्याने पुढे हरित क्रांती घडून आली. याच इतिहासाची पुनरावृत्ती आज घडत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेस केलेले काटकसरीचे आवाहन म्हणजे, भविष्यातील संभाव्य संकटाची तीव्रता कमी करण्याची पूर्वतयारी आहे. शास्त्रीजी आणि नरेंद्र मोदी यांच्या आवाहनांची तुलना करताना केवळ शब्दांची नव्हे, तर त्यामागील काळ, संकटाचे स्वरूप, समाजमानस आणि राजकीय शैली यांचीही तुलना करावी लागते. दोघांनीही देशवासीयांना सामूहिक शिस्त आणि त्यागाचे आवाहन केले; मात्र त्या आवाहनांचा संदर्भ, स्वरूप आणि परिणाम वेगळे होते. शास्त्रीजींनी आवाहन केले, तेव्हा अन्नटंचाई, आर्थिक परिस्थिती, अस्थिरता आणि युद्धजन्य परिस्थितीशी संघर्ष सुरू होता. अशा वेळी त्यांनी केलेले आवाहन अन्न या अत्यंत मूलभूत गरजेशी संबंधित होते. त्यामध्ये त्यागाची प्रत्यक्ष आणि ठोस भावना होती. दुसरीकडे, पंतप्रधान मोदी यांची अनेक आवाहने वेगवेगळ्या संकटांच्या किंवा मोहिमांच्या परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित करणारी ठरली. कोविड-१९ महामारीच्या काळातील 'जनता कर्फ्यू', दिवे लावणे किंवा 'व्होकल फॉर लोकल' यांसारख्या आवाहनांचे स्वरूप प्रतीकात्मक आणि जनसंपर्ककेंद्री होते. त्यांचा उद्देश लोकांमध्ये सहभाग, मनोबल आणि सामूहिकतेची भावना निर्माण करणे हा होता. काही आवाहनांना मोठा प्रतिसाद मिळाला; तर काहींवर प्रतीकात्मकतेचा अतिरेक झाल्याची टीकाही झाली.

अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी जनतेस केलेल्या काटकसरीच्या आवाहनावर आता उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. कालपरवापर्यंत, युद्धस्थितीतही भारतामध्ये असलेल्या सुरक्षिततेच्या जाणिवा जपत शेजारच्या घरात लागलेल्या आगीचे चटके बसत नसल्याच्या भावनेने सुखावणारे अनेकजण आता मात्र अस्वस्थ झाले आहेत. ही आग आपल्या घरांपर्यंत पोहोचू शकते, हे कळण्याएवढा सामाजिक विवेक मुळातच असणे अपेक्षित असताना, त्याचीच जाणीव करून दिली गेल्यावर लगेचच त्याची खिल्ली उडविण्यासाठी अनेक जण सरसावले आहेत. परिस्थिती इतकी गंभीर होती, तर सरकारने आधीच काटकसरीचे किंवा त्यागाचे संदेश का दिले नाहीत, असा या आक्षेपाचा सूर असावा. निवडणुका, प्रचारसभा, मोठे सार्वजनिक कार्यक्रम किंवा परदेश दौरे सुरू असताना हे संकट इतके प्रकर्षाने मांडले गेले नाही, पण आता मात्र जनतेला संयम, त्याग किंवा बचतीचे आवाहन करण्यात आले. त्यामुळे हे 'उशिरा सुचलेले शहाणपण' आहे, अशी टीका होत आहे. विशेषतः इंधनदरवाढ, महागाई, ऊर्जा संकट किंवा युद्धजन्य तणावाच्या पृष्ठभूमीवर सामान्य नागरिकांवर अतिरिक्त भार पडत असताना सरकारने प्रतीकात्मक आवाहनांपेक्षा धोरणात्मक उपायांवर अधिक भर द्यायला हवा होता, असे विरोधकांचे म्हणणे असावे. ते अगदीच नाकारता येणार नाही, पण मुळातच, कोणत्याही संकटकाळाच्या झळा आपल्यापर्यंत पोहोचत नाहीत तोवर स्वस्थ राहणे या जुन्या मानसिकतेची मुळे अजूनही कुठेतरी जिवंत आहेत हेच या अपेक्षांमधून प्रतिध्वनित होत नाही काय? अशा काळात कसे वागावे यासाठी राज्यकर्त्यांवर आवाहने करण्याची वेळ येण्याआधी असा समजूतदारपणा स्वतःहून दाखविणे ही काळाची सामान्य अपेक्षा असते. रशिया-युक्रेन युद्ध किंवा जागतिक ऊर्जा संकटामुळे अनेक देशांत इंधनटंचाई, महागाई, वीजकपात आणि पुरवठा साखळी विस्कळीत होणे असे परिणाम दिसत असताना भारतात तुलनेने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात आली. भारताने स्वस्त दरात रशियन तेल खरेदी, विविध देशांशी संतुलित परराष्ट्र धोरण, अन्नधान्य साठा आणि कल्याणकारी योजनांद्वारे मोठे सामाजिक धक्के काही प्रमाणात रोखले. त्या तुलनेत भारतात दैनंदिन जीवन फार मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले नाही, ही बाबदेखील या निमित्ताने अधोरेखित होते. त्यामुळेच, मोदी यांनी उशिरा का होईना, जनतेस केलेले आवाहन म्हणजे, संकट अधिक गंभीर होण्याआधीची सावधगिरीची सूचना आहे. परिस्थिती अधिक गंभीर होऊ नये म्हणून आधीच मानसिक तयारी करण्याच्या नीतीचाच हा एक भाग मानावयास हवा. जेव्हा जागतिक ऊर्जासंकट अधिकच अनिश्चित होत गेले, तेव्हा लोकसहभागातून ऊर्जा बचत किंवा संयमाचे संदेश देणे हे प्रतिबंधात्मक नीतीचाच भाग होता, असे आता स्पष्टदेखील झाले आहे. कोणतेही आवाहन केवळ प्रशासनिक नसते. त्याला राजकीय संदर्भ असतोच. त्यामुळे सरकारच्या समर्थकांना या आवाहनात दूरदृष्टी दिसेल, तर टीकेसाठी सरसावणाऱ्या विरोधकांस ते उशिरा सुचलेले शहाणपण वाटेल. सत्य बहुधा या दोन टोकांच्या मध्ये असते. केवळ संकट आल्यावरच्या आवाहनांवर नव्हे, तर संकट केव्हा ओळखले, त्याचे त्याचे परिणाम किती कमी ठेवले आणि लोकांमध्ये विश्वास किती टिकवला यावरही कोणत्याही राजकीय नेतृत्वाच्या क्षमतेची कसोटी होत असते.

---

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# कच्च्या तेलाच्या व्यापारावर परिणाम?

'ओपेक' ही जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांची संघटना आहे. १९६० मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेचा मुख्य उद्देश जागतिक तेल उत्पादनावर नियंत्रण ठेवून किमती स्थिर ठेवणे हा आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक, कुवेत आणि व्हेनेझुएला या देशांनी मिळून तिची स्थापना केली होती. नंतर संयुक्त अरब अमिरातीसह इतर देशही त्यात सहभागी झाले. पुढे २०१६ मध्ये 'ओपेक प्लस'ची स्थापना झाली. त्यात रशियासह इतर काही देशांचाही समावेश करण्यात आला. जगातील जवळपास ३५ टक्के कच्च्या तेलाचे उत्पादन 'ओपेक' देशांकडून होते. त्यामुळे या संघटनेचे निर्णय जागतिक तेलबाजारावर थेट परिणाम करतात. अनेक दशकांपासून 'ओपेक' उत्पादन कोटा ठरवून तेलाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवत आला आहे. उत्पादन कमी करून किमती वाढवणे किंवा उत्पादन वाढवून बाजार स्थिर ठेवणे ही त्यांची पारंपरिक भूमिका राहिली आहे. अशा परिस्थितीत 'यूएई'सारख्या मोठ्या तेल उत्पादक देशाने 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेणे ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. 'ओपेक'मध्ये 'यूएई' हा चौथा सर्वांत मोठा तेल उत्पादक देश मानला जातो. २०२४ मध्ये 'यूएई' दररोज सुमारे २९.२ लाख पिंप तेल उत्पादन करत होता. त्यामुळे त्याच्या बाहेर पडण्यामुळे 'ओपेक'च्या एकात्मतेवर आणि प्रभावापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. 'यूएई'ने आपल्या निवेदनात म्हटले आहे, की हा निर्णय 'राष्ट्रीय हित' लक्षात घेऊन घेण्यात आला आहे. देशाच्या दीर्घकालीन आर्थिक आणि धोरणात्मक उद्दिष्टांनुसार ऊर्जा क्षेत्रात अधिक गुंतवणूक वाढवणे आणि भविष्यातील जागतिक ऊर्जा बाजाराच्या गरजांनुसार स्वतंत्र भूमिका घेणे आवश्यक असल्याचे 'यूएई'चे मत आहे.

प्रत्यक्षात पाहता, या निर्णयामागे दोन मोठी कारणे दिसून येतात. पहिले कारण म्हणजे जागतिक तेलबाजारातील अस्थिरता आणि पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती. अमेरिका आणि इस्रायलच्या इराणविरोधातील कारवायांमुळे होर्मुज सामुद्रधुनीवरील तणाव वाढला आहे. जगातील सुमारे २५ टक्के समुद्री तेल व्यापार आणि २० टक्के एलएनजी पुरवठा या मार्गातून होतो. त्यामुळे या मार्गावरील संकटाचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होत आहे. दुसरे आणि अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे सौदी अरेबिया आणि 'यूएई'मधील वाढते मतभेद. सौदी अरेबियाला 'ओपेक'चा अनौपचारिक नेता मानले जाते. उत्पादन कोटा, तेल धोरण आणि बाजार नियंत्रण याबाबत यूएई आणि सौदी अरेबियामध्ये काही वर्षांपासून मतभेद असल्याचे बोलले जात होते. 'यूएई'ने गेल्या काही वर्षांमध्ये स्वतःची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी मोठी गुंतवणूक केली; पण 'ओपेक'च्या कोटा व्यवस्थेमुळे त्याला अपेक्षित उत्पादन करता येत नव्हते. त्यामुळे 'यूएई'ची स्वतंत्रपणे उत्पादन वाढवण्याची इच्छा होती. यामुळे आता 'यूएई' 'ओपेक'च्या उत्पादन मर्यादांपासून मुक्त होणार आहे. म्हणजेच तो बाजारातील परिस्थितीनुसार स्वतःचे तेल उत्पादन वाढवू किंवा कमी करू शकतो. विशेषतः आशियातील वाढत्या मागणीचा फायदा घेण्याचा 'यूएई'चा प्रयत्न असल्याचे दिसते. चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया हे देश ऊर्जा वापराच्या दृष्टीने वेगाने वाढत आहेत आणि 'यूएई'ला या बाजारपेठांमध्ये अधिक मजबूत उपस्थिती हवी आहे.

भारतासाठी या घडामोडी विशेष महत्त्वाच्या आहेत. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. त्यातील मोठा भाग मध्यपूर्वेतून येतो. 'यूएई' हा भारताचा प्रमुख ऊर्जा भागीदार असून भारताच्या एकूण तेल आयातीत त्याचा मोठा वाटा आहे. 'यूएई'ने उत्पादन वाढवले, तर भविष्यात भारताला अधिक स्थिर आणि कदाचित स्वस्त दरात तेल मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेला काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. वाढत्या जागतिक तणावाच्या पृष्ठभूमीवर ऊर्जेसाठी भारताकडे विविध पुरवठा स्रोत उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे; मात्र चित्र इतके सोपे नाही. कारण सध्या होर्मुज सामुद्रधुनीवरील तणाव कायम आहे. हा मार्ग पूर्ण क्षमतेने खुला होत नाही, तोपर्यंत उत्पादन वाढवले, तरी प्रत्यक्ष पुरवठा सुरळीत होईल असे नाही. 'यूएई'कडे फुजैराहसारखी पर्यायी बंदरे असली, तरी त्यांची क्षमता मर्यादित आहे. याशिवाय, या निर्णयामुळे 'ओपेक'च्या भविष्यासंदर्भातही प्रश्न निर्माण झाले आहेत. मोठे उत्पादक देश स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी संघटनेबाहेर जाण्याचा मार्ग निवडू लागल्यास 'ओपेक'ची एकत्रित ताकद कमी होऊ शकते. भविष्यात इतर देशही अशाच प्रकारचा विचार करू शकतात. ऊर्जा राजकारणाच्या दृष्टीने पाहता ही घटना जागतिक शक्ती समीकरणातील बदल दर्शवते. एकेकाळी तेलबाजारावर मोजक्या देशांचे नियंत्रण होते. आज मात्र प्रत्येक देश आपले स्वतंत्र आर्थिक हित, गुंतवणूक आणि भू-राजकीय भूमिका लक्षात घेऊन निर्णय घेत आहे.

भारतासाठी ही परिस्थिती संधी आणि आव्हान दोन्ही घेऊन येते. एका बाजूला अधिक पुरवठा आणि संभाव्य स्थिर किमतींची शक्यता आहे, तर दुसऱ्या बाजूला मध्यपूर्वेतील अस्थिरता, वाढते युद्धजन्य वातावरण आणि समुद्री मार्गांवरील धोके कायम आहेत. या सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे ऊर्जा हा केवळ आर्थिक विषय राहिलेला नाही. तो आता जागतिक राजकारण, युद्ध, कूटनीती आणि राष्ट्रीय सुरक्षेचा केंद्रबदू बनला आहे. 'यूएई'चा 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा निर्णय हे त्याचेच एक मोठे उदाहरण आहे. गेली सहा दशके तेलाच्या जागतिक किमतींवर नियंत्रण ठेवणाऱ्या एका बलाढ्य कार्टेलच्या वर्चस्वाला बसलेला हा सर्वांत मोठा तडाखा आहे. संयुक्त अरब अमिरातीचा हा निर्णय अचानक घेतलेला वाटत असला तरी त्याची पाळेमुळे गेल्या काही वर्षांमधील सौदी अरेबिया आणि 'यूएई' यांच्यातील वाढत्या मतभेदांमध्ये दडली आहेत. संयुक्त अरब अमिरातीने आपल्या तेल उत्पादन क्षमतेत प्रचंड गुंतवणूक केली आहे. सध्या त्यांची क्षमता दिवसाला सुमारे ४८.५ लाख पप इतकी आहे; परंतु 'ओपेक'च्या नियमांमुळे त्यांना केवळ ३५-३६ लाख पपच उत्पादन करण्याची परवानगी होती. त्यामुळे आपल्या नैसर्गिक संसाधनांचा पूर्ण वापर करून महसूल वाढवण्याच्या अमिरातीच्या महत्त्वाकांक्षेला 'ओपेक'चे निर्बंध अडथळा ठरत होते.

संयुक्त अरब अमिरातीला २०२७ पर्यंत आपली उत्पादन क्षमता ५० लाख पपापर्यंत न्यायची आहे. तेल संपण्यापूर्वी त्याचा जास्तीत जास्त फायदा उठवणे हे संयुक्त अरब अमिरातीचे धोरण सौदी अरेबियाच्या 'किमती स्थिर ठेवण्यासाठी उत्पादन कमी करणे' या धोरणाशी विसंगत ठरले. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये केवळ तेलावरूनच नव्हे, तर येमेनमधील सुरक्षा धोरण आणि मध्यपूर्वेतील नेतृत्वावरूनही स्पर्धा सुरू झाली आहे. संयुक्त अरब अमिरातीचा 'ओपेक' त्याग हा केवळ आर्थिक नसून एक रणनीतिक बदल आहे. गेली अनेक वर्षे 'ओपेक' म्हणजे सौदी अरेबियाची हुकूमत असे समीकरण होते. संयुक्त अमिरातीच्या बाहेर पडण्यामुळे सौदी अरेबियाचे या संघटनेतील वजन कमी झाले आहे. एका अर्थाने संयुक्त अरब अमिरातीने आपली 'धोरणात्मक स्वायत्तता' जाहीर केली आहे. 'गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल' (जीसीसी) मध्ये संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबिया हे दोन मुख्य स्तंभ आहेत. या निर्णयामुळे या देशांमधील एकीला तडा गेला असून, इराणसारख्या शत्रू देशासमोर आखाती देशांची आघाडी कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा विविधांगी अडचणींमुळे या निर्णयाची आणि त्याच्या संभाव्य परिणामांची जगभर चर्चा आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# समाजाची उदासीनता भ्रष्टाचाराला पोषक

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड असून जनतेच्या सहभागाविना भ्रष्टाचाराचा हा राक्षस समाजामधून हद्दपार होऊ शकत नाही, हे वास्तव आहे. आजमितीस भ्रष्टाचार हा शिष्टाचार समजला जात असला, तरी भविष्यामध्ये देश आणि समाजावर त्याच्या होणाऱ्या घातक परिणामाची चिंता व चिंतन करताना कोणीच दिसून येत नाही. याबाबत समाजामध्ये असलेली कमालीची उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांचे सहज फावते आणि ही मालिका अविरत सुरू राहते. भ्रष्टाचारामुळे देश पोखरला गेला आहे. तो सहन न करण्याचे व त्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचे धोरण आहे. सुरुवातीपासूनच हा विषय नरेंद्र मोदी त्यास प्राथमिकता देऊन प्राधान्याने हाताळीत आहे. देशाला व सामान्य जनतेला लुटणाऱ्या भ्रष्ट लोकांना कदापिही सोडले जाणार नाही, या धोरणास त्यांनी प्राथमिकता देऊन हा लढा अधिक तीव्र केला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढताना मोदींच्या मनातील तळमळ अनेकदा देशवासीयांनी अनुभवली आहे. अनेकदा याबाबत त्यांनी देशवासीयांसमोर आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्यामुळे या लढाईमध्ये देशामधील सामान्य जनतेचे सहकार्यही त्यांना अपेक्षित आहे. सामान्य जनतेच्या सहकार्याविना हा लढा जिंकणे अशक्य असल्याने त्यांच्या या लढ्यामध्ये प्रत्येकाने आपला सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराची सुरुवात समाजाच्या मूकसंमतीनेच होत असते, हे उघड आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांचे चांगलेच फावते. यापुढे आपल्या आयुष्यामध्ये भ्रष्टाचाराला थाराच देणार नाही, असा ठाम निर्धार करून अशी शपथ जर प्रत्येकाने घेतली तर सरकारच्या लढ्याला अधिक बळ मिळून देशाची वाटचाल एक भ्रष्टाचारमुक्त देश म्हणून सहज होऊ शकते. जनतेच्या सहकार्यानेच या लढ्याला यश मिळू शकते. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढताना पंतप्रधानांनी कोणाचीही तमा न बाळगता व विरोधकांच्या हल्ल्याची पर्वा न करता हा लढा निर्धारपूर्वक सुरू ठेवला आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत हे त्यांचे स्वप्न आहे. नरेंद्र मोदी यांच्या पावलावर पाऊल ठेवून राज्य शासनानेही भ्रष्टाचार विरोधातील लढ्यास गती देणे आवश्यक आहे. हा लढा लढण्यास सहज आणि सोपा नाही, याची जाणीव सर्वांनाच आहे. या लढ्यामध्ये स्वकीयांशीच दोन हात करावे लागणार आहे. त्यासाठी तारेवरची कसरत करून पुढे जावे लागणार आहे. ही वाट अतिशय बिकट आहे. याची जाणीव असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी कोणाचीही तमा न बाळगता गोरगरिबांच्या हितासाठी अधिक तीव्रतेने हा लढा पुढे रेटत आहेत. कोणतेही शासकीय काम सहजासहजी होत नाही, हा आजवरचा नागरिकांचा अनुभव आहे. ग्रामीण भागातील तळहातावर पोट घेऊन जगणाऱ्या व रोजमजुरीवर काम करून जगणाऱ्या गरिबांना शासकीय कार्यालयाचे उंबरठे रोज झिजविणे परवडणारे नसते. एखाद्या लहानशा कामासाठी रोजमजुरी पाडून दिवसभर कार्यालयामध्ये ताटकळत बसणे हे त्यांच्या कुटुंबासाठी उपासमारीचे कारण ठरू शकते. गोरगरिबांची नेमकी हीच असहायता हेरली जाते आणि नकळत असे गोरगरीब भ्रष्टाचाराच्या आहारी जातात. त्यांच्यापुढे पर्यायच उपलब्ध नसतो. त्यामुळे आज भ्रष्टाचारास शिष्टाचाराचे स्वरूप प्राप्त झाल्याचे बघावयास मिळत आहे. पंतप्रधान मोदी यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध आपली दिशा स्पष्टपणे ठरविली आहे. त्यांच्या जवळपास ११ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये एकही घोटाळा न घडणे, हे त्यांच्या यशाचे आणि ठाम निर्धाराचे श्रेय आहे. या देशाने यापूर्वी अनेक घोटाळ्यांची मालिका अनुभवली आहे. त्यामुळे आपल्या देशामध्ये काळ्या पैशाची एक समांतर मालिका उभी राहिली होती. मोदींच्या या ठाम निर्धाराने देशामधील अनेक बडे राजकारणी मोदींच्या या अस्त्राने घायाळ झाले असून आपली वर्षानुवर्षे चालणारी दुकानदारी बंद पडल्यामुळे ते सध्या चवताळले आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वाट्टेल ते आरोप करून त्यांना बदनाम करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येत आहे. विरोधकांची ही दुटप्पी चाल जनताही ओळखून आहे. त्यामुळे मोदी विरोधकांचे धाबे दणाणले आहेत, एवढे मात्र नक्की.

९८८१७१७८५६




---

## विशेष

**प्रवीण राऊत**

# पांढऱ्या कोटाआड लपलेले अश्रू

**आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन दरवर्षी १२ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. आधुनिक परिचर्या (नर्सिंग) क्षेत्राच्या संस्थापिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा हा जन्मदिवस आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो.**



राज्याच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीत ज्या क्षेत्राचा अमूल्य वाटा आहे तो म्हणजे परिचारिका, मात्र या क्षेत्रावर पद्धतशीरपणे पांघरूण घातले गेल्याचे वास्तव आहे जे नाकारता येणारे नाही. रुग्णालयाच्या पांढऱ्या शुभ्र भिंती, औषधांचा दर्प आणि मशीनचा तो एकसुरी आवाज... या सगळ्या नीरस आणि अनेकदा भीतिदायक वाटणाऱ्या वातावरणात जर कोणता एक दिलासादायक घटक असेल, तर तो म्हणजे रुग्णाच्या उशाशी रात्रंदिवस उभी असणारी परिचारिका (नर्स). वेदनेने विव्हळणाऱ्या रुग्णाला मायेचा स्पर्श देणारी, मध्यरात्रीच्या भयाण शांततेत आशेचा किरण बनून वावरणारी ही परिचारिका खऱ्या अर्थाने आरोग्य सेवेचा कणा असते. दुर्दैवाने आज महाराष्ट्रात या कण्यालाच वाळवी लागली आहे. राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला तारणाऱ्या हजारो परिचारिकांची अवस्था आज अत्यंत दयनीय, विदारक आणि मन सुन्न करणारी झाली आहे. महाराष्ट्रातील नर्सिंग क्षेत्राच्या या सद्यःस्थितीचे, त्यांच्या मूक वेदनांचे आणि कोलमडत चाललेल्या व्यवस्थेकडे सर्वांगीण आणि संवेदनशीलतेने पाहण्याची नितांत आवश्यकता आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने एका आदर्श आणि मजबूत आरोग्य व्यवस्थेसाठी काही सुस्पष्ट निकष आखून दिले आहेत. सामान्य रुग्ण कक्षात, अति दक्षता विभागात आणि आपत्कालीन कक्षात किती रुग्णांच्या मागे किती परिचारिका असाव्यात याचे निकष निश्चित केले आहे. प्रगत महाराष्ट्रात नर्सिंग क्षेत्राची अशी अवकळा आणि अधोगती ही राज्याच्या पुरोगामी प्रतिमेला लागलेला एक मोठा कलंक म्हणून उदय होण्यास सुरुवात झाली आहे. याचे खरे वास्तव समजून घ्यायचे असल्यास शासकीय रुग्णालये अत्यंत उत्तम ठिकाण आहे. शासकीय वैद्यकीय रुग्णालये असोत वा सार्वजनिक आरोग्य रुग्णालये, सर्वत्र परिचारिकांची प्रचंड वानवा आहे. एकाच परिचारिकेवर अनेक रुग्णांची, कधी कधी संपूर्ण रुग्ण कक्षाची जबाबदारी निर्दयीपणे सोपवली जाते. कामाचा हा अमानवीय ताण त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची अक्षरशः चाळण करतो. याचा थेट परिणाम रुग्णसेवेच्या दर्जावर होतोच. पण देणे घेणे कुणाला आहे? राज्याच्या दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून ते गजबजलेल्या जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय रुग्णालयपर्यंत सर्वत्र हीच भयावह परिस्थिती आहे. वैद्यकीय विभागाच्या रुग्णालयातील अवस्था आणि ग्रामीण महाराष्ट्रातील रुग्णालयाची अवस्था समान वाटेवर आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अशी अवस्था आहे की एकाच परिचारिकेला संपूर्ण केंद्राचा डोलारा सांभाळावा लागतो तर शहरांत असलेल्या रुग्णालयात रुग्णांत परिचारिकेला शोधावे लागत आहे. हे केवळ त्या परिचारिकेवरच नव्हे, तर तिथे उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांवरही केलेला शासकीय, प्रशासकीय दुर्लक्षातून झालेला घोर अन्याय आहे. महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमधील नर्सिंग विभागात रिक्त पदांचा प्रश्न आता केवळ एक समस्या राहिलेला नाही, तर ते एक महामारीचे रूप धारण करत आहे. रुग्णालयात परिचारिकांच्या प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय नेतृत्वाची धुरा ज्यांच्या खांद्यावर असते, ती अधिसेविका आणि त्यांच्या सोबतीला सहायक अधिसेविका, परिसेविका. ही अत्यंत महत्त्वाची पदे जवळपास दहा-दहा वर्षांपासून रिक्त आहेत. ज्या पदावर बसणाऱ्या व्यक्तीच्या हाती रुग्णालयातील नर्सिंग व्यवस्थापनाची, शिस्तीची आणि नियोजनाची सूत्रे असतात, त्याच पदावर जर कायमस्वरूपी नेमणूक नसेल, पदोन्नत्या मिळणार नसतील तर त्या रुग्णालयाचा गाडा कसा चालणार? हा प्रश्न शासनकर्त्यांच्या आणि त्यांच्या आधिपत्याखाली असलेल्या अधिकारी वर्गाच्या सद्सदविवेकबुद्धीला का टोचत नाही?

केवळ रुग्णालयांमध्येच नव्हे, तर जिथे भविष्यातील परिचारिका घडवल्या जातात, त्या नर्सिंग विद्यालयांमध्येही भयाण परिस्थिती आहे. विद्यालय-महाविद्यालये नावाच्या मोठमोठ्या इमारती निर्माण केल्या. त्यात शिक्षणाला विद्यार्थी आणले गेले. पण त्यांना शिकविण्यासाठी आवश्यक पदांचे काय? तात्पुरती मलमपट्टी किती काळ? जेव्हा इमारत बांधण्याचे निर्णय होतात तेव्हाच पदाची मान्यता आणि भरती, पदोन्नती का नाही? सामान्य गोरगरीब वर्गातील मुलं शिकतात म्हणून का? की कोणत्याही मोठ्या पदावरील अधिकाऱ्यांची मुलं-मुली शिकत नाही म्हणून उदासीनता का? मागील ८ वर्षांपासून शासकीय परिचारिका विद्यालयात पाठ्यनिर्देशिका यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. या पदाचे सेवाप्रवेश नियम १९६४ पासून आहे. मग यात बदल करायला कुणाच्या हाताला लकवा मारला होता? अजूनही त्याला गती का दिली गेली नाही?

एखाद्या व्यक्तीने आपले संपूर्ण आयुष्य एकाच पदावर, कोणत्याही बढतीशिवाय व्यतीत करावे, यासारखी मोठी शिक्षा कोणती असू शकते? मात्र ती परिचारिकांवर आलेली असून त्या सहन करत आहे. नर्सिंग क्षेत्रातील सर्वांत मोठी आणि हृदयद्रावक समस्या म्हणजे सेवाप्रवेश नियमांचा अभाव. साध्या सेवाप्रवेश नियमांसाठी गेल्या वीस-वीस वर्षांपासून परिचारिका डोळ्यांत प्राण आणून प्रतीक्षा करत पदोन्नतीची वाट पाहत आहे. या विभागाच्या सचिवांचे आयुक्तांचे आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अगदी नियोजित वेळी पदोन्नत्या होतात. मग त्यांच्या आधिपत्याखाली कार्यरत परिचारिका, परिसेविका, अधिसेविका, पाठ्यनिर्देशिका, या पदाचे कोण बघणार? प्रशासकीय अनास्थेमुळे जर नियमावली तयार व्हायला दशक लोटत असतील तर का म्हणून परिचारिका वर्गकडून चांगल्या रुग्णसेवेच्या अपेक्षा करता? महाराष्ट्रातील नर्सिंग क्षेत्राला या भीषण संकटातून बाहेर काढायचे असेल, तर मलमपट्टीचे उपाय चालणार नाहीत. त्यासाठी काही तातडीच्या आणि दीर्घकालीन शस्त्रक्रियात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. सेवाप्रवेश नियमांची तातडीची अंमलबजावणी, रिक्त पदांची युद्धपातळीवर भरती, नर्सिंग शिक्षणावर कठोर नियंत्रण, कामाच्या सुविधा आणि वेतन, उच्च शिक्षण आणि संशोधनाला चालना या उपाययोजना आवश्यक आहेत. परिचारिका म्हणजे केवळ डॉक्टरच्या मागे उभ्या राहणाऱ्या किंवा रुग्णाच्या बेडशेजारी उभ्या असणाऱ्या एक व्यक्ती नाहीत. त्या संपूर्ण आरोग्य व्यवस्थेचा श्वास आणि आत्मा आहेत. या आत्म्याशिवाय डॉक्टरांची कितीही मोठी कौशल्ये, कोट्यवधी रुपयांची अत्याधुनिक आणि सोफिस्टिकेटेड उपकरणे, भव्य इमारती आणि शासनाच्या कागदावरील आरोग्य योजना या सर्वांचा कवडीमोलाचाही उपयोग नाही. नर्सिंग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाशिवाय निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न हे केवळ एक मृगजळच राहील. त्यामुळे आता मलमपट्टीचे उपाय आणि स्वार्थाचे राजकारण बाजूला ठेवून, परिचारिकांच्या हिताला आणि त्यांच्या मागण्यांना सर्वोच्च प्राधान्य देणे हीच काळाची सर्वांत मोठी गरज आहे.

९४०३६४०९३३

---

### मनपाचे ग्रीन शेड नेट

नागपूर महानगरपालिकेने एप्रिल २०२६ च्या कडक उन्हापासून वाहनचालकांना दिलासा देण्यासाठी नागपूर शहरातील प्रमुख वाहतूक सिग्नलवर ग्रीन शेड नेट लावण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. काही ठिकाणी पाण्याचे तुषार देखील लावल्याचे वृत्त आहे. त्यासाठी धन्यवाद. सिग्नलवर थांबणाऱ्या वाहनचालकांना सूर्यप्रकाशापासून सावली मिळते आहे. परंतु हा प्रकल्प एप्रिल महिन्यात पूर्णत्वास जायला हवा होता. काही चौकांमध्ये ग्रीन शेड नेट लावण्याचे काम अजून सुरू आहे. अर्धा उन्हाळा होऊन गेल्यावर हे काम सुरू केले आहे. उशिरा का होईना पण या ग्रीन शेडमुळे वाहनचालकांना थंडावा मिळतो आहे. फक्त उन्हाळा संपायच्या आत सगळीकडचे काम पूर्ण व्हावे ही अपेक्षा आहे. सध्याच्या वातावरणाची अनिश्चितता बघता गेल्यावर्षी नेट पडल्याच्या तक्रारींमुळे यावर्षी ते अधिक मजबूतपणे बसवावे जेणेकरून पुढील काही दिवस सामान्यजनांसाठी दिलासादायक असतील.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### मुक्ताबाई : अध्यात्म, करुणा, आत्मज्ञानाची तेजस्वी ज्योत

महाराष्ट्राच्या संतपरंपरेत अनेक संतांनी आपल्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. या संतपरंपरेत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ यांच्याप्रमाणेच एक तेजस्वी आणि विलक्षण व्यक्तिमत्त्व म्हणजे संत मुक्ताबाई होय. अल्पायुष्यातही त्यांनी अध्यात्म, समता, करुणा आणि आत्मज्ञानाचा जो संदेश दिला, तो आजही समाजासाठी दीपस्तंभ ठरतो. मुक्ताबाई या केवळ संत ज्ञानेश्वरांच्या धाकट्या भगिनी नव्हत्या, तर त्या एक उच्च कोटीच्या ज्ञानी योगिनी, कवयित्री आणि संत होत्या. त्यांच्या अभंगांमधून प्रकटणारे तत्त्वज्ञान हे अतिशय साधे, सरळ आणि जीवनाला दिशा देणारे आहे.

मुक्ताबाईंचा जन्म इ. स. १२७९ च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील विठ्ठलपंत आणि आई रुक्मिणीबाई हे अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला होता; परंतु नंतर संसारात परत आल्यामुळे

## वाचक पत्रे



समाजाने त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला बहिष्कृत केले. या बहिष्काराचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर झाला. समाजाकडून अपमान, उपेक्षा आणि दुःख सहन करताना मुक्ताबाई, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर आणि सोपानदेव या भावंडांनी आपल्या आध्यात्मिक शक्तीने जीवनाला अर्थ दिला.

मुक्ताबाईंच्या आयुष्यातील संघर्ष अत्यंत वेदनादायी होता. लहान वयातच आई-वडिलांचे निधन झाले. समाजाने दरवाजे बंद केले; परंतु या दुःखाने त्या खचल्या नाहीत. उलट त्यांनी आत्मज्ञानाच्या मार्गाने स्वतःला घडवले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात करुणा, सहनशीलता आणि अद्वैत तत्त्वज्ञानाची गूढ अनुभूती दिसून येते. त्यांचे संपूर्ण जीवन हे ''संतत्व म्हणजे केवळ पूजा नव्हे, तर अंतःकरणातील निर्मळता'' याचे जिवंत उदाहरण होते. त्यांचे अध्यात्म अत्यंत व्यापक होते. त्यांनी देवाला मंदिरापुरते मर्यादित मानले नाही. त्यांच्या दृष्टीने परमेश्वर हा प्रत्येक जीवामध्ये वसलेला होता. म्हणूनच त्यांनी जातिभेद, अहंकार आणि दंभ यांना तीव्र विरोध केला. त्यांचे विचार समाजाला समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारे होते. त्यांच्या अभंगांतून जीवनाचे खोल तत्त्वज्ञान अत्यंत साध्या भाषेत व्यक्त झालेले दिसते. मुक्ताबाई या महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आकाशातील एक तेजस्वी चांदणी होत्या. त्यांनी आपल्या ज्ञानाने, प्रेमाने आणि करुणेने समाजाला प्रकाश दिला. त्यांच्या विचारांचा संदेश मानवतेला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या जीवनातून आपण समता, सहनशीलता, आत्मज्ञान आणि प्रेम यांचे अमूल्य धडे घेतले पाहिजेत.

**कुमार व्यंकटेश नेरकर**/अमरावती, ७६२०६८७३०३

### युद्धामुळे इंधनटंचाईचे संकट

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील जागतिक युद्धाचे ढग आता गडद होत आहेत. देशात इंधनटंचाई तोंड वर काढीत आहे. बचत, काटकसर हे शब्द व्यवहारातून बाजूला झाले आहेत. ते आता पुन्हा उपयोगी ठरणार आहेत. इंधन बचत जनतेने पुन्हा सुरू करावी असे शासनाने सूचित केले आहे. जनतेने आता बचत करण्याची सवय अंगीकारली पाहिजे. सार्वजनिक वाहन व्यवस्थेचा वापर करावा. आस्थापनांनी कोरोना काळात सुरू केलेले वर्क फ्रॉम होम चालू ठेवून आता आठवड्याचे सर्व दिवस घरूनच काम करण्यास सुरू करावे. जनतेने वाहतूक, पर्यटन कमी करावे. असे झाले तरच इंधनटंचाईवर मात करता येईल. सोने, चांदीची खरेदी कमी करावी. यातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन वाचेल इत्यादी अनेक पर्याय आहेत, असे विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले आहेत. पक्षभेद विसरून सर्वांनी देशातील या संकटप्रसंगी एकत्र येणे गरजेचे आहे.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## शिक्षणाच्या जोरावर मिळवले यश; कु. निशिगंधा ओगलेची मंत्रालयात लिपिक पदावर निवड



**परळी** | प्रतिनिधी

परळीसारख्या शहरातून अत्यंत सामान्य परिस्थितीत शिक्षण घेत पुढे आलेल्या कु. निशिगंधा सिधू ओगले हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर महसूल विभागातील लिपिक पदावर निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.तीचे शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात नवी मुंबई वाशी येथे झाले आहे. उद्यापासून ती मंत्रालय, मुंबई येथे सेवेत रुजू होणार आहे.

निशिगंधाचे वडील सिद्धू उर्फ सिद्धार्थ ओगले हे मुंबईसारख्या मोठ्या शहरात गॅस टाकी सप्लाय करण्याचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कुटुंबात आई रंजना सिधू ओगले,भाऊ निशिकांत सिधू ओगले आणि सगळ्यात छोटी बहीण निशिता सिधू ओगले असा परिवार आहे. कुटुंबाची परिस्थिती सर्वसाधारण असतानाही मुलीच्या शिक्षणासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत निशिगंधानेही शिक्षणात सातत्य ठेवून हे यश प्राप्त केले.

फक्त शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे निशिगंधाने सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या या यशामुळे ओगले परिवारासह परळी शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

निशिगंधाच्या यशाबद्दल सर्व स्तरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# भुकेल्यांच्या ताटात माणुसकीचा घास

## परळीमध्ये ग्लोबल विकास ट्रस्टच्या मोफत अन्नछत्र सेवेचा शुभारंभ

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

समाजातील गरजू, शेतकरी आणि कष्टकरी बांधवांच्या पोटाची भूक भागवण्याचा मानवतेचा वसा घेत जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने परळी वैजनाथ येथे “मोफत अन्नछत्र” सेवेचा सोमवारी, दि. ११ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरालगत, संकटमोचन हनुमान मंदिरासमोर सुरू करण्यात आलेली ही सेवा अनेक गरजूंना आधार देणारी ठरणार आहे. महाराष्ट्र दिनाच्या औचित्यावर 01 मे रोजी सिरसाळा येथे यापूर्वीच अन्नछत्र सेवेचा शुभारंभ करण्यात आला असून तेथे दररोज 90 ते 100 गरजूंना लाभ होत आहे.

परळीसह परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि विविध कामानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांची या भागात दररोज मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा कष्टकरी बांधवांना किमान एक वेळच्या अन्नाची चिंता भासू नये, त्यांच्या पोटाला अन्न मिळावे आणि माणुसकीची ऊब



अनुभवायला मिळावी, या उदात्त हेतूने गुरुजींच्या आशीर्वादातून परळी वैजनाथ आणि सिरसाळा येथे ही मोफत अन्नछत्र सेवा सुरू करण्यात आली आहे.

> यावेळी बोलताना जलनायक मयंक गांधी यांनी सांगितले की, “अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. समाजातील कोणताही व्यक्ती उपाशी राहू नये, हीच आमची भूमिका आहे. मानवतेच्या भावनेतून सुरू केलेली ही सेवा समाजातील माणुसकी अधिक दृढ करेल.”

या उद्घाटन सोहळ्यास डॉ. हरिश्चंद्र वंगे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, विविध व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष माऊली फड, श्रीराम मुंडे, पाटलोबा मुंडे, नंदलाल बियाणी, पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे, माजी नायब तहसीलदार बी.एल. रुपनर, बाजार समितीचे सचिव बलवीर रामदासी यांच्यासह व्यापारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्लोबल विकास ट्रस्टच्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा एक नवा आदर्श निर्माण झाला असून, “भुकेल्याला अन्न” या संकल्पनेतून माणुसकीचा खरा धर्म जपला जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पंकजाताई मुंडे यांनी सरस्वती नदी काँक्रीटीकरणा पासून वाचवल्याबद्दल आभार; अश्विन मोगरकर

परळी वैजनाथ: शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीपात्राचे खोलीकरण करताना त्या ठिकाणी सिमेंट कॉंक्रिटीकरण करू नये, अशा स्पष्ट सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षा व नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. या निर्णयामुळे गाव भागातील जलस्रोत सुरक्षित राहण्यास मदत होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. परळीकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्वरित कार्यवाही केल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचे हजारों परळीकरांच्या वतीने अश्विन मोगरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

गावभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदी साठी शासनाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र, नदीपात्राच्या तळाशी कॉंक्रिटीकरण केल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरणार नाही, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली होती. नदीपात्रातून पाणी झिरपल्यामुळेच गाव भागातील आड आणि बोअरची पाणी पातळी टिकून राहते. जर कॉंक्रिटीकरण झाले,



तर भविष्यात पाणीटंचाईचे मोठे संकट उभे राहील, असे गाऱ्हाणे नागरिकांनी पंकजाताई मुंडे यांच्याकडे मांडले होते.

सरस्वती नदीचे धार्मिक महत्व पौराणिक काळापासून सांगितले जाते. पूर्वी बारामही वाहणारी नदी अजूनही वर्षात सात-आठ महिने वहात आहे. काळानुरूप अनेक अतिक्रमणे नदीत वाढल्याने नदीचे पात्र अरुंद झाले आहे. परळी नगरपरिषदेने यात नदीला नाला दाखवत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रयत्न केला मात्र जागरूक नागरिकांनी यास विरोध करीत शॉपिंग कॉम्प्लेक्स चे काम बंद पाडले होते. आता शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नदीचे कॉंक्रीटीकरण करण्याचा घाट घालण्यात आला. याविरोधात परळीकरांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडे तक्रारी करून काम सुरू होऊ नये यासाठी निवेदने देण्यात आली. ना. पंकजाताई मुंडे यांनी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्वरित लक्ष देऊन परळी गावभागाचे वाळवंट होण्यापासून रोखले. परळी वरचं आपलं लक्ष व काळजी यातून दिसते. परळीत होऊ पाहणाऱ्या घातक प्रकल्पाबाबत संवेदनशीलता दाखवत नागरिकांच्या या मागणीची तातडीने दखल घेत, ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षा व पालिका प्रशासनाला पर्यावरण आणि जलस्रोतांचा विचार करून कॉंक्रिटीकरण न करण्याची सूचना केली.

लोकभावनेचा आदर करत घेतलेल्या या निर्णयाबद्दल परळीकरांच्या वतीने अश्विन मोगरकर यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

## अवैध वाळू उपशामुळे तरुणाचा मृत्यू? सावळेश्वर येथील घटनेने खळबळ



गेवराई तालुक्यातील सावळेश्वर येथे अवैध वाळू उपशादरम्यान सचिन पुरी या तरुणाचा झालेला मृत्यू संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. या घटनेनंतर आता महसूल व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, “जिल्हाधिकारी साहेब, व्हिडिओ व्हायरल झाला... कारवाई करणार कोण?” असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

अवैध वाळू प्रकरणी पोलीस व महसूल खाते फक्त पैसे खायलाच का?

गेवराई तालुक्यातील सावळेश्वर येथे अवैध वाळू उपशादरम्यान सचिन पुरी या तरुणाचा झालेला मृत्यू संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट निर्माण करणारा ठरला आहे. हायवा वाहनात वाळू भरताना लोडरच्या खोऱ्यातील दगड डोक्यात पडल्याने सचिन पुरी यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर आता नागरिकांकडून पोलीस व महसूल प्रशासनावर गंभीर आरोप करण्यात येत आहेत.

“अवैध वाळू उपसा सुरू असताना प्रशासन नेमके काय करत होते?”, “पोलीस व महसूल खाते फक्त पैसे खाण्यासाठीच आहे का?” असे संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

जिल्हाधिकारी साहेब, व्हिडिओ व्हायरल झाला... कारवाई करणार कोण?

**गेवराई** | प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सावळेश्वर येथे अवैध वाळू उपशाच्या कामादरम्यान एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. हायवा वाहनात वाळू भरत असताना लोडरच्या खोऱ्यातील दगड तरुणाच्या डोक्यात पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला असल्याचे स्थानिकातून बोलले जात असून मृत तरुणाचे नाव सचिन पुरी असे असून ही घटना सोमवार दि. ११ मे रोजी रात्री घडल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सावळेश्वर परिसरात रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा सुरू होता. यावेळी हायवा वाहनात वाळू भरताना लोडरमधून मोठा दगड खाली पडून तो सचिन पुरी यांच्या डोक्यात लागला. गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेनंतर महसूल व पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. घटनेच्या आदल्या दिवशी त्याच ठिकाणी महसूल पथकाने कारवाईदरम्यान पकडलेले हायवा वाहन पैसे घेऊन सोडल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. संबंधित प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचेही बोलले जात आहे. मात्र, व्हिडिओ समोर येऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.“जर त्या वेळी कठोर कारवाई झाली असती आणि हायवा वाहन सोडले नसते, तर आज सचिन पुरी जिवंत असता,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे सावळेश्वर परिसरात अवैध वाळू उपसा पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला असून, संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून महसूल व पोलीस प्रशासनातील संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## श्री सुधाकर कुलकर्णी ज्योतिष शास्त्री, यांच्या ग्रह मिलन: सुखी आणि स्थिर विवाहाची एक शास्त्रीय कला, पुस्तकाचे एक प्रकाशन

**पुणे(प्रतिनिधी)** | श्री सुधाकर कुलकर्णी ज्योतिष शास्त्री यांच्या" ग्रह मिलन सुखी आणि स्थिर विवाहाची शास्त्रीय कला"या पुस्तकाचे प्रकाशन श्री गोविंद शास्त्री नाशिक ,यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर ज्योतिष शास्त्रातील अत्यंत अभ्यासू आणि त्या शास्त्रात पारंगत असलेले श्री गोविंद शास्त्री ,प्रा. सोनाली ताई हरसूल कर, डॉ ,राजेंद्र मुळे,ऍड,शैलेश नाईक,श्री विवेक गद्रे,श्रीभुलेश्वर महाराज श्री कानीफ नाथ संस्थान,आदी मान्यवर मंडळीची उपस्थिती होती.प्रथम सर्व मान्यवरांचा शाल पुष्प गुच्छ देऊनश्री सुधाकर कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी श्री गोविंद शास्त्री यांनी पुस्तक प्रकाशन करताना श्री सुधाकर कुलकर्णी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि भरपूर परिश्रम घेऊन असे परिपूर्ण पुस्तक तयार केले असून यामध्ये ज्योतिष



शास्त्रातील सखोल अशी मांडणी केल्याबद्दल त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.सर्वच मान्यवरांनी आपले ज्योतिष विषयक विचार मांडले, आणिश्री सुधाकर कुलकर्णी यांचे कौतुक केले , पुस्तक तयार करताना सर्वच मान्यवर मंडळींचे सहकार्य मिळाल्याबद्दल श्री सुधाकर कुलकर्णी यांनी सर्वांचागौरवपूर्ण उल्लेख केला.आणि त्याबद्दल ऋण व्यक्त केले.याच वेळी, श्री सुधाकर कुलकर्णी ज्योतिष शास्त्री यांचा नम्रता क्रिस्टल पार्क मधील ज्येष्ठ सदस्य प्रा.डी.एस. कुलकर्णी,श्री बाबुराव तरसे,श्री विलास गाडगे आणि श्री हिंदुराव जाधव यांनी डायरी आणि पेन पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्र संचलन सौ,कामिनी कुलकर्णी यांनी केले आणि सर्वांचे आभार मानले. यावेळी श्री अतिश घोणे तसेच प्रतिष्ठित मंडळी,नातेवाईक, मोठ्यसंख्येने उपस्थित होते.अल्पोपहार दिल्यानंतर कार्यक्रम संपला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्रीराम कुलकर्णी शुभांगी कुलकर्णी आणि त्यांच्या भगिनी,ध्रुव कुलकर्णी व नातेवाईक यांनी भरपूर परिश्रम घेतले.....

## नगर परिषद सीओ वर हल्ला करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करावी- अशोक लोढा

बीड (प्रतिनिधि) - दि. १०/०५/२०२६ रोजी बीड नगर परिषद कार्यालयात आपले कर्तव्य बजावत असलेल्या कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे यांच्यावर शेख निजाम आमीन व शेख इम्रान निजाम यांनी शिवीगाळ करत, जीवे मारण्याची धमकी देत प्राणघातक हल्ला केला. श्री शैलेश फडसे यांनी कारभार हातात घेतल्या पासून नगर परिषदेचा कारभार अत्यंत पारदर्शक व नियोजनबद्ध चालू आहे. तरी काही नितिभृष्ठ लोकांना स्वतःच्या फायद्यासाठी चुकीच्या कामात अडथळा निर्माण होत आहे. त्यांच्या कसल्याही दबावाला बळी न पडल्या मुळे त्यांना अशाप्रकारे जीवे मारण्याची धमकी देत हल्ला करणे हा अत्यंत अनुचित प्रकार घडला आहे. सध्याची परिस्थिती बघता महाराष्ट्रात बीडची या ना त्या कारणाने बदनामी होत असताना हा असा प्रकार घडणे अत्यंत निंदनीय आहे. तसे पाहता बीड मध्ये चांगल्या, कर्तव्यदक्ष अधिकार्यांची कमी आहे जर हे असेच चालू राहिले तर बाहेरील नवीन चांगले अधिकारी बीडमध्ये येण्यास नकार देतील. या मध्ये बीडकरांचे मोठे नुकसान आहे. ही घटना अत्यंत गंभीर असून त्याचे गांभीर्य लक्षात घेता संबंधित आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, जेणे करून येत्या काळात अशी हिम्मत कोणी करणार नाही या अनुषंघाने भाजप बीड शहर मंडळच्या वतीने निषेध केला असून मा. जिल्हाधिकाऱ्यांना आरोपीवर कारवाई करण्यात यावी या साठी निवेदन देण्यात आले.

## संयुक्त जयंती निमीत्तच्या भीमगीत कार्यक्रमाला अतुल मुंडे,राहूल गदळे,बचुटे यांची उपस्थिती

## बुध्द,फुले,डॉ.आंबेडकरांची गीते गाऊन इंगळेनी उपस्थितांची मने जिंकली

**केज ( प्रतिनिधी )** | केज तालुक्यातील देवगांव येथे महामानव तथागत गौतम बुध्द,क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमीत्ताने दि.९ मे शनिवारी संध्याकाळी कवि गायक राजेंद्र इंगळे (भारजकर)आणि पार्टी अंबाजोगाई यांच्या भिमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे उध्दघाट्न देवगावचे सरपंच अतुल दादा मुंडे ,भाजपा युवा मोर्चाचे केज तालुका अध्यक्ष राहूल भैय्या गदळे,पत्रकार गौतम बचुटे,यांनी केले. या कार्यक्रमाला गावातील नागरीक व महिला व तरुण युवक मोठ्या संख्येंने उपस्थित होते. केज तालुक्यातील



देवगांव येथे महामानव तथागत गौतम बुध्द, क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमीत्ताने दि.९ मे शनिवारी संध्याकाळी कवि गायक राजेंद्र इंगळे (भारजकर) आणि पार्टी अंबाजोगाई यांच्या भिमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित केला होता.यावेळी गौतम बुध्द, क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन देवगांवचे सरपंच अतुल(दादा) मुंडे ,भाजपा युवा मोर्चाचे केज तालुका अध्यक्ष राहूल भैय्या गदळे,पत्रकार गौतम बचुटे,पत्रकार अशोक नागरगोजे उपसरपंच सुभाष मुंडे यांनी केले. यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे शाल हार देऊन स्वागत केले. संयुक्त जयंती निमीत्त आयोजीत केलेल्या समाज प्रभोदन भीमगीत कार्यक्रमाचे उध्दघाट्न सरपंच अतुल (दादा) मुंडे,राहूल भैय्या गदळे,गौतम बचुटे,अशोक नागरगोजे,सुभाष मुंडे यांनी केले.गायक राजेंद्र इंगळे यांनी समाज प्रभोदन करुन सर्व महानवांच्या जिवनावर सुमधुर गीते गाऊन उपस्थीत सर्वांचे मने जिंकली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार महादेव गायकवाड,अर्जून गायकवाड,डॉ. शरद गायकवाड,चिवळा गायकवाड,आरुण कांबळे,विशाल गायकवाड,दैवान कांबळे,शिवाजी गायकवाड,राणु कांबळे,अजय कांबळे यांच्यासह संयुक्त जयंती उत्सव समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

## कॅफेच्या नावाखाली चालणारे अश्लील प्रकार तातडीने बंद करण्याची मागणी

**बीड** | कॅफेच्या नावाखाली चालणारे अश्लील प्रकार तातडीने बंद करावेत ! अशी मागणी आमदार प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

माजलगाव शहरात अनेक कॅफे सुरू आहेत. मात्र काही ठिकाणी कॅफेच्या नावाखाली राजरोसपणे अश्लील व बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. यापूर्वीही एका मुलीवरील अत्याचाराची घटना समोर आली होती, परंतु त्यानंतर अपेक्षित व ठोस कार्यवाही झालेली दिसून आली नाही.

अनेक कॅफे आवश्यक परवान्यांशिवाय सुरू असून अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. काही ठिकाणी अल्पवयीन मुला-मुलींची ये-जा वाढत असून गैरप्रकार घडत असल्याच्या घटनांमुळे पालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच नियमबाह्य सुरू असलेले कॅफे तात्काळ बंद करण्यात यावेत, अशी सूचना प्रशासनाला यावेळी करण्यात आली. समाजात अशा प्रकारांना थारा मिळू नये आणि युवकांचे भविष्य सुरक्षित राहावे, हीच भूमिका असल्याचे स्पष्ट केले.

## अंबाजोगाईत मध्यरात्री भीषण अग्नितांडव: इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर दुकानासह कारखाना जळून खाक

**अंबाजोगाई** | अंबाजोगाई शहरातील रिंगरोडवरील बँक कॉलनी परिसरात मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत लहू आणि अंकुश सुरवसे यांचा "विराट इलेक्ट्रॉनिक्स अँड भांडी फर्निचर" हा व्यवसाय पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. या आगीत दुकान, गोडाऊन तसेच फर्निचर तयार करण्याचा कारखाना जळून खाक झाला असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग





विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. मध्यरात्री लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे मोठे लोट दूरवरूनही दिसत होते. स्थानिक नागरिकांनीही घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाला सहकार्य केले.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने ग्राहकांच्या मागणीसाठी दुकानात नवीन इलेक्ट्रॉनिक वस्तू, भांडी आणि तयार फर्निचरचा मोठा साठा करण्यात आला होता. तसेच कारखान्यात विविध प्रकारचे फर्निचर तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. मात्र, मध्यरात्री अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांत सर्व साहित्य जळून खाक झाले. अनेक वर्षांच्या मेहनतीतून उभा केलेला व्यवसाय डोळ्यादेखत जळताना पाहून सुरवसे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, अधिकृत कारण अग्निशमन विभाग आणि संबंधित यंत्रणांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. प्रशासनाकडून पंचनामा आणि नुकसानीचा अंदाज घेण्याचे काम सुरू असून व्यापारी वर्गातून सुरवसे कुटुंबीयांना मदतीची मागणी होत आहे.

## माळीवेस हनुमान मंदिर येथे श्रीमद भागवत कथेचे आयोजन

बीड (प्रतिनिधी):- येथील माळीवेस हनुमान मंदिरात अधिक मासानिमित्त महिला समितीच्या वतीने श्रीमद् भागवत कथा सप्ताह सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले आहे. हा भक्ती सोहळा दि.25 मे ते 31 मे 2026 या कालावधीत संपन्न होणार आहे.

ग्रंथदिंडीने होणार प्रारंभ

दिनांक 25 मे सोमवार रोजी कथेच्या पहिल्या दिवशी सकाळी 8 वाजता बलभीम चौक ते माळी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत महिला डोक्यावर तुलसी वृंदावन, कलश घेऊन सहभागी होणारा असून टाळ मृदंगाच्या गजरात शोभायात्रा



काढण्यात येणार आहे. त्यानंतर ग्रंथ पूजन करून भागवत कथेला प्रारंभ होईल. या ज्ञान यज्ञात कथाकार बीडचे सुपुत्र सध्या श्रृंगेरी येथे शिक्षण घेत असलेले भार्गव महाराज जोशी हे आपल्या ओघवत्या वाणीतून भागवत कथेचे निरूपण करणार आहेत. कथेद्वारे धर्म, अध्यात्म देशभक्ती, ज्ञान, विज्ञान यांचा संगम घडवून समाजात सकारात्मक विचारांच्या श्रवणांचा लाभ भाविकांना होणार आहे. कथेदरम्यान श्रीकृष्ण जन्म, गोवर्धन पूजा, रुक्मिणी स्वयंवर, सुदामा भेट यासारखे महत्त्वाचे प्रसंग जिवंत देखाव्याच्या माध्यमातून साजरे केले जातील. या सप्ताहात काकड आरती, दुपारी 3 ते 6.30 श्रीमद् भागवत, कथा संध्याकाळी सामुहिक आरती होईल. कथेची सांगता दिनांक 31 मे रोजी दुपारी 2 वाजता आरती होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या अध्यात्मिक सोहळ्याचा जास्तीत जास्त भाविकांनी घ्यावा असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विश्वास कोकणे यांची अध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१२ मे -**
धाराशिव जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती विश्वास हनुमंत कोकणे यांची राष्ट्रीय जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य असोसिएशन संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती ११ मे २०२६ पासून पुढील नवीन निवड होईपर्यंत कायम राहणार आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष कैलास गोरे पाटील यांनी विश्वास कोकणे यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

खामसवाडी (ता. कळंब) येथील मूळ गावात त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. जिल्हा परिषद समाजकल्याण सभापतीपदानंतर आता आणखी एक राजकीय जबाबदारी मिळाल्याने भाजप नेते तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील, भाजप नेते संजय पाटील तसेच गावकऱ्यांनी शुभेच्छा देत त्यांचे अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### हणमंत पडवळ यांना ‘काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्कार’ प्रदान

**येरमाळा, दि.१२ मे -**
काव्यप्रेमी शिक्षक मंच आयोजित काव्यप्रेमी साहित्य, संस्था, प्रेरणा व शि.क.बा. पुरस्कार वितरण सोहळा सोलापूर येथील लोकमान्य टिळक सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात धाराशिव येथील कवी, साहित्यिक व वात्रटिकाकार हणमंत पडवळ यांना त्यांच्या उल्लेखनीय साहित्यसेवा व काव्यप्रेमी शिक्षक मंचासाठी दिलेल्या योगदानाबद्दल ‘काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ.इ.जा. तांबोळी, डॉ. सुहास पुजारी व पद्माकर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. हणमंत पडवळ यांच्या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### गुणवंत विद्यार्थिनींचा विजय वाघमारे यांच्या हस्ते सत्कार

**उमरगा, दि.१२ मे -**
माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) २०२६ मध्ये १०० टक्के गुणांसह विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार उपनगराध्यक्ष विजय वाघमारे यांच्या वतीने करण्यात आला. यामध्ये आकांक्षा महेश पाटील, गौरी सचिन बिद्री, गायत्री महादेव पाटील व दिव्या वैभव बचुटे यांचा पुष्पगुच्छ व अभिनंदनपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी नगरसेवक विजय दळगडे, अभिजीत मोरे, बाबा मस्के, अजय वाघमारे, याकूब लदाफ, ज्ञानेश्वर पाटील, सुभाष कांबळे, इम्रान शेख, संकेत वाघमारे आदी उपस्थित होते.

### साहित्य भारतीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी भैरवनाथ कानडे

**धाराशिव, दि.१२ मे -**
अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या धाराशिव जिल्हा शाखेची सन २०२६-२७




या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून जिल्हाध्यक्षपदी भैरवनाथ कानडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. देवगिरी प्रांताची महत्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. कार्याध्यक्षपदी प्रा. सुनिता गुंजाळ-कवडे, उपाध्यक्षपदी प्रा.डॉ. दीपक सुर्यवंशी व डॉ. रुपेशकुमार जावळे यांची निवड करण्यात आली. संघटनमंत्रीपदी प्रा.डॉ. कृष्णा तेरकर, सहकार्यवाहपदी समाधान शिकेतोड, कार्यालय प्रमुखपदी प्रा.डॉ. सहदेव रसाळ तर कोषाध्यक्षपदी बी. सुरभी यांची निवड करण्यात आली आहे.

### स्वाभिमान दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप

**कळंब, दि.१२ मे -**
बाळासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनानिमित्त साजऱ्या होणाऱ्या ‘स्वाभिमान दिना’चे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय, कळंब येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब टोपे यांच्या हस्ते रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ. लामतुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, शितलकुमार गायकवाड, भैय्या टोपे, दिपक टोपे, बाळासाहेब वाघमारे, अतुल टोपे, चिंटू समुद्रे, नंदकुमार सावंत, प्रतीक टोपे, प्रज्ञेश टोपे, दिनेश वाघमारे, किशोर धावारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## कांदा रडवतोय... बळीराजा हतबल... शेतकऱ्यांनी जगायचं कसं?

# सरकार शेतकऱ्यांना गृहीत धरतंय का!

### कांदा उत्पादक शेतकरी भगवान साबळे यांनी संतापाच्या भरात तब्बल ६०० गोण्या कांदा पेटवून दिला...



**जिल्ह्यात यंदा कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार तब्बल १५ हजार ६०६ हे. क्षेत्रावर कांद्याची लागवड**

### कांद्याला ४० रुपये किलोप्रमाणे भाव द्या...



कांद्याला अत्यंत कमी दर मिळत असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. भूम तालुक्यातील तिंत्रज येथील कांदा उत्पादक शेतकरी भगवान साबळे यांनी संतापाच्या भरात तब्बल ६०० गोण्या कांदा पेटवून दिला. कांद्याच्या लागवडीपासून काढणी, कटाई आणि वाहतूक यासाठी तीन ते चार लाख रुपयांपर्यंत खर्च झाला. मात्र बाजारात अवघा एक रुपया किलो दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सरकारने कांद्याला शाश्वत हमीभाव देऊन किमान ४० रुपये किलो दर निश्चित करावा, तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति किलो २० रुपये प्रमाणे अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### भंगाराला भाव, पण शेतकऱ्यांच्या मालाला नाही...

शेतकऱ्यांची अपेक्षा फार मोठी नाही; फक्त आपल्या कष्टाच्या मालाला योग्य दर मिळावा, अशी भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. राज्यात सध्या भंगार आणि रद्दीलाही चांगला भाव मिळत असून भंगार किंवा रद्दीचा कागदही प्रति किलो ४० रुपयांनी विकला जात आहे. मात्र शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करून पिकवलेल्या कांदा, सोयाबीन, कापूस, टोमॅटो, आंबा तसेच पालेभाज्या आणि फळभाज्यांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. दिवसरात्र शेतीमातीमध्ये राबून, घाम गाळून उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. योग्य भावाअभावी अनेकांना कर्जबाजारीपणाचा सामना करावा लागत असून काही शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलताना दिसून येतो आहेत. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतीमालाला हमीभाव आणि योग्य बाजारभाव देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१२ मे -**
राज्यात कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांच्या डोळ्यात पुन्हा एकदा अश्रू आले आहेत. उत्पादन खर्च प्रचंड वाढलेला असताना बाजारात कांद्याला कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. सरकारकडून ठोस निर्णय होत नसल्याने ग्रामीण भागातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील तिंत्रज येथे घडलेल्या घटनेने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले आहे. कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्याने संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकरी भगवान साबळे यांनी तब्बल ६०० गोण्या कांदा पेटवून दिला. ही घटना केवळ एका शेतकऱ्याची व्यथा नसून राज्यातील हजारो कांदा उत्पादकांच्या वेदनेचे प्रतीक मानली जात आहे. भगवान साबळे यांनी चार एकर क्षेत्रात कांद्याची लागवड केली होती. त्यापैकी अडीच एकरातील कांद्याची काढणी करून सुमारे ६०० गोण्या कांदा तयार करण्यात आला होता. मात्र बाजारात कांद्याला अवघा ५० रुपये क्विंटल, तर काही ठिकाणी केवळ एक रुपया किलो दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली. कांद्याच्या लागवडीपासून खत, औषधे, मजुरी, कटाई, वाहतूक आणि साठवणूक यासाठी तीन ते चार लाख रुपयांपर्यंत खर्च झाल्याचे भगवान साबळे यांनी सांगितले. मात्र एवढा खर्च करूनही योग्य भाव मिळत नसल्याने त्यांनी संतापाच्या भरात संपूर्ण कांदा पेटवून दिला.

धाराशिव जिल्ह्यात यंदा २०२५-२६ या वर्षात खरीप आणि रब्बी हंगामात कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार तब्बल १५ हजार ६०६ हेक्टर क्षेत्रावर कांद्याची लागवड करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणावर कांदा उत्पादन झाले असले तरी बाजारातील दर घसरल्याने जिल्ह्यातील हजारो शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. सध्याच्या परिस्थितीत शेती ही परवडणारी राहिलेली नाही, हे वास्तव दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालले आहे. मात्र शेती करण्याशिवाय शेतकऱ्यांसमोर दुसरा कोणताही पर्याय नसल्याने तो संकटांशी दोन हात करत शेती कसत राहतो. निसर्गाचा लहरीपणा, अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट यांसारख्या संकटांमुळे पिकांचे मोठे नुकसान होते. त्यातच शेतीमालाला मिळणारे अत्यल्प बाजारभाव शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत.

पेरणीपासून काढणीपर्यंत बियाणे, खत, औषधे, मजुरी, वीज, पाणी आणि वाहतूक यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. शेती पिकांवरील हा आर्थिक भुर्दंड दिवसेंदिवस वाढत असताना उत्पादनाला मात्र हमीभाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला येऊन केवळ शेती टिकवण्यासाठी धडपड करत असल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

घरची आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही मोठ्या हिमतीने शेतकरी शेती कसत राहतो. कर्ज काढून, दागिने गहाण ठेवून किंवा सावकारांकडून व्याजाने पैसे आणून तो पिक उभं करतो. मात्र नैसर्गिक संकटांबरोबरच बाजारातील घसरलेले दर त्याला पूर्णपणे हतबल करून टाकतात. उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा मोबदला अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही.

शेतीमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल बनत असून अनेक ठिकाणी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. कांदा, सोयाबीन, कापूस, टोमॅटो यांसारख्या पिकांच्या दरातील चढ-उतारामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी जगायचं कसं? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना बाजारातील दर कोसळत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अक्षरशः आर्थिक विवंचनेत सापडला आहे.

शासनाकडून सातत्याने आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्षात कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. शेतकऱ्यांची थट्टा थांबवून सरकारने शाश्वत हमीभाव, बाजार स्थैर्य आणि नुकसान भरपाई यावर ठोस निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शेती टिकली तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल आणि शेतकरी वाचला तरच देशाचा विकास शक्य होईल, अशी भावना आता सर्वसामान्य शेतकरी व्यक्त करत आहे.

शेतकरी संघटनांकडून सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला शाश्वत हमीभाव द्यावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी तसेच कांदा खरेदीसाठी विशेष योजना बनवाव्यात, अशी मागणी होत आहे. कांद्याला किमान ४० रुपये किलोप्रमाणे दर मिळाला तरच उत्पादन खर्च भरून निघू शकतो, असे मत शेतकरी व्यक्त करत आहेत.

### आमदार राणादादांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...



राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले असून त्यांना तातडीने दिलासा देण्याबरोबरच पर्यायी पीक धोरण राबवावे, अशी मागणी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. वाढते तापमान, अवकाळी पाऊस, साठवणुकीतील नुकसान आणि बाजारातील घसरलेले दर यामुळे शेतकरी अडचणीत आल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. सध्या कांद्याला केवळ ४५० ते ५५० रुपये किंवा त्यापेक्षाही कमी प्रति क्विंटल दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे केवळ अनुदान नव्हे तर दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक असल्याचे असून कांदा उत्पादकांना तातडीचे अनुदान, जैवऊर्जा पिकांसाठी प्रशिक्षण, अनुदान आणि करार शेती धोरण लागू करावे, अशी मागणी आमदार राणादादांनी केली आहे.

## स्पा सेंटरचा धंदा सुरळीत ठेवण्यासाठी ‘हप्ता’

# ३६ हजारांची लाच घेताना कळंबचे दोन पोलिस अंमलदार जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१२ मे -**
रिलॅक्स स्पा सेंटरचा व्यवसाय सुरळीत सुरू ठेवण्यासाठी ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ३६ हजार रुपये स्वीकारताना दोन पोलिस अंमलदारांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याने पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथील पोलिस उपअधीक्षक बाळू संपती जाधवर यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. आरोपी पोलिस अंमलदार अशोक दादाराव करवर आणि सिद्धेश्वर प्रकाश शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांचा कळंब येथे रिलॅक्स स्पा सेंटरचा व्यवसाय आहे.

हा व्यवसाय कोणतीही अडचण न येता सुरळीत सुरू ठेवण्यासाठी पोलिस अंमलदार सिद्धेश्वर शिंदे यांनी पोलिस निरीक्षकांसाठी २० हजार रुपये, तर पोलिस अंमलदार अशोक करवर यांनी दुय्यम अधिकाऱ्यांसाठी २० हजार रुपये असा एकूण ४० हजार रुपयांचा ‘हप्ता’ लाच म्हणून मागितल्याचा आरोप आहे.




तक्रारदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली असता, तू जर अधिकाऱ्यांना भेटलास तर ते तुझा स्पाचा व्यवसाय बंद करून तुझ्यावर कारवाई करतील. धंदा सुरळीत चालवायचा असेल तर आम्हालाच हप्ता द्यावा लागेल आणि या विषयावर काही बोलायचे असेल तर ते आमच्या दोघांशीच बोलावे लागेल, असे आरोपींनी सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

त्यानंतर तक्रारदार पंचांसमवेत बागवान चौक, कळंब येथे गेले असता, सिद्धेश्वर शिंदे यांनी पोलिस निरीक्षकांसाठी २० हजार रुपये आणि अशोक करवर यांनी दुय्यम अधिकाऱ्यांसाठी १६ हजार रुपये अशी एकूण ३६ हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारण्याचे पंचांसमक्ष कबूल केले. यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला.

कळंब शहरातील होळकर चौकातून तांदळवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या हॉटेल गुलमोहर बिर्याणी हाऊससमोर तक्रारदाराच्या स्विफ्ट कारमध्ये दोन्ही आरोपींना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले. माधुरी केदार कांगणे, पोलिस अधीक्षक तथा शशिकांत सिंगारे, अपर पोलिस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी विजय वगरे, पोलिस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशिव हे पुढील तपास करीत आहेत.

## लोकमंगलच्या ४८ व्या सामुदायिक विवाह सोहळ्यात ११ जोडपी विवाहबद्ध



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मे -**
लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ४८ वा सामुदायिक विवाह सोहळा रविवारी (दि. १० मे) धाराशिव येथे उत्साहात पार पडला.

सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सोहळ्यात ११ हिंदू जोडपी विवाहबंधनात अडकली. विवाह सोहळ्यास हजारो वऱ्हाडी मंडळींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी सुभाष देशमुख, रोहन देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यातील विशेष बाब म्हणजे श्रीकृष्ण पंडित पांचाळ (रा. सारणी, ता. लोहारा) या नवरदेवाने विवाहाच्या दिवशी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. आयोजित रक्तदान शिबिरात एकूण २२ जणांनी रक्तदान केले.

लोकमंगल फाउंडेशनने २००६ पासून सामुदायिक विवाह सोहळ्याची परंपरा सुरू केली असून यंदा या उपक्रमाला २० वे वर्ष पूर्ण झाले आहे. आतापर्यंत ४८ सोहळ्यांमधून ३२२१ जोडपी विवाहबंधनात अडकली आहेत. यामध्ये हिंदू समाजातील २५०८, बौद्ध समाजातील ६८१, मुस्लिम समाजातील २१, ख्रिश्चन समाजातील ४ तर जैन समाजातील ७ जोडप्यांचा समावेश आहे.

यावेळी रामराजे पाटील, जयसिंह देशमुख, बालाजी शिंदे, सचिन आडगळे, लिंबराज साळुंके, रामदास अण्णा कोळगे, प्रभाकर मुळे, विजय शिंगाडे, गजानन वडणे, अनिल जाधव, बाबा बेटकर, मकरंद लबडे, श्याम गाटे, तानाजी पाटील, भास्कर बोंदर, मोहन खापरे, रमेश आप्पा रणदिवे, सरकारी वकील अमोल गुंड आणि लोकमंगल परिवाराचे सदस्य उपस्थित होते.

## गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या जन्मदिनानिमित्त धाराशिवात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मे -**
जगभरात शांतता, मानवता आणि अध्यात्माचा संदेश देणारे श्रीश्री रविशंकर यांच्या ७० व्या जन्मदिनानिमित्त धाराशिव शहरात विविध सामाजिक, आध्यात्मिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १३ मे रोजी हे कार्यक्रम आर्ट ऑफ लिव्हींग आणि श्रीश्री रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात येत आहेत.

या निमित्ताने सकाळी सुदर्शन क्रिया, योग व ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले असून रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. समाजात आरोग्य, सकारात्मकता आणि



सेवाभाव वाढविण्याच्या उद्देशाने हे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर शहरातील श्री श्री रविशंकर बालमंदिर या नवीन कॅम्पसचे उद्घाटन करण्यात येणार आहे. श्री गजानन महाराज मंदिरामागे, पोस्ट कॉलनी, धाराशिव येथे सुरू होणाऱ्या या नव्या शैक्षणिक केंद्रामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना मूल्याधारित आणि सर्वांगीण शिक्षणाची नवी संधी उपलब्ध होणार आहे.

संध्याकाळी ७ वाजता याच ठिकाणी भव्य सत्संगाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## माणकेश्वर-शेकापूर रोडवरून स्कुटी चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मे -**
माणकेश्वर शिवार ते शेकापूर रोड परिसरातून ८० हजार रुपये किंमतीची स्कुटी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी शरद सुखदेव उमाप (वय ४२, रा. माणकेश्वर, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची ग्रे रंगाची स्कुटी (क्र. एमएच २५ बीसी २४८३) दि. ५ मे २०२६ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास माणकेश्वर शिवार ते शेकापूर रोड येथून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी शरद उमाप यांनी दि.११ मे रोजी दिलेल्या खबरीवरून परंडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नीट परीक्षा रद्द ; नांदेड जिल्ह्यातील १५ हजार विद्यार्थ्यांचे वाढले टेंन्शन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मे -**

नांदेड - भारतातील एमबीबीएस, बीडीएस, आयुष आणि पशुवैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतली जाणारी नीट परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द करून या सर्व पेपर फुटीच्या प्रकरणाची चौकशी करण्याची जबाबदारी सीबीआयवर सोपविण्यात आली आहे. या सर्व प्रक्रियेत विद्यार्थ्यांची मात्र कोंडी झाली असून विद्यार्थ्यांसह पालकांवरही प्रचंड मानसिक ताण आला आहे. ही परीक्षा आता पुन्हा एकदा घेण्यात येणार असल्याचे नॅशनल टेस्टिंग एजन्सी द्वारा स्पष्ट करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील १५ हजार ४५८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती.

नांदेड जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर ३ मे रोजी नीट परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेची तयारी विद्यार्थी दहावीनंतर लगेच सुरू करतात. त्यामुळे दोन वर्षापासून केलेली संपूर्ण तयारी आता पेपर फुटीच्या प्रकरणामुळे




पाण्यातच गेल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील १५ हजार ८४० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली होती. त्यापैकी १५ हजार ४५८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. या परीक्षेसाठी शहरी भागात २४ तर ग्रामीण भागात २२ परीक्षा केंद्र स्थापन केले होते. या केंद्रावर अतिशय कडक वातावरणात परीक्षा घेण्यात आल्या.

या परीक्षेसाठी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी केंद्रावर मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य निश्चित करणारी ही परीक्षा अतिशय महत्त्वपूर्ण होती. यासाठी विद्यार्थ्यांनी आपले संपूर्ण कसब पणाला लावले होते.

यंत्रणेतील त्रुटीमुळे आणि भ्रष्टाचाराच्या वाळवीमुळे गतवर्षीही नीटचा पेपर फुटला होता; मात्र परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला नव्हता. गतवर्षीच ही परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडली होती. २०२४ मध्येही नीटचे पेपर फुटल्याप्रकरणी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. तर आजा ३ मे रोजी घेण्यात आलेल्या रद्द केल्याने परीक्षा आता पुन्हा कधी घेतल्या जाणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. त्याचवेळी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा आता या नीट परीक्षेची तयारी करावी लागणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांचा ताण वाढला आहे. त्यात पालकांची चिंताही वाढली आहे.

# उष्णतेच्या ठिणगीने संसाराची राख



**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १२ मे -**

तालुक्यातील नागराळ गावात उष्णतेमुळे झालेल्या शॉर्टसर्किटने एका कुटुंबाचा संसार अक्षरशः राख करून टाकल्याची हृदयद्रावक घटना घडली. काही क्षणांत घरातून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा उसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या आगीत रोख रक्कम, घरगुती साहित्य आणि महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली असून अंदाजे १ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

नागराळ येथील बालाजी गणपतराव काठेवाडे हे आपल्या मुलासह शेतात जागलीसाठी गेले होते. घरात पत्नी, आई व सुन अंगणात झोपल्या असताना रात्री साडेदहाच्या सुमारास अचानक घरातून धूर आणि ज्वाळा बाहेर येऊ लागल्या. घाबरलेल्या सुनेने तातडीने फोन करून माहिती दिल्यानंतर बालाजी काठेवाडे व त्यांचा मुलगा गावकऱ्यांसह घटनास्थळी धावले.

**७५ हजार रुपयासह कागदपत्रेही आगीत जळाली**

गावकऱ्यांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात आली; मात्र तोपर्यंत संसारातील बहुतेक साहित्य आगीत जळून खाक झाले होते. गादीखाली ठेवलेले तब्बल ७५ हजार रुपये, कपडे, अन्नधान्य, कुलर, फॅन, टीव्ही, लाकडी पलंग, कपाट यांसह घरातील सर्व महत्त्वाची कागदपत्रे आगीत भस्मसात झाली. विशेष म्हणजे मुलांचे जन्म दाखले, शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक आणि मृत्यू प्रमाणपत्रही आगीत नष्ट झाले.

**क्षणात होत्याचं नव्हतं झालं**

एका क्षणात उभा संसार जळून गेल्याने काठेवाडे कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले आहे. क्षणात होत्याचं नव्हतं झालं, अशी व्यथा कुटुंबीयांनी व्यक्त केली. या घटनेमुळे नागराळ परिसरात हळहळ व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांतून केली जात आहे. दरम्यान, या घटनेची मारखेल पोलीस ठाण्यात आकस्मात आगीची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वडिलांचे छत्र हरपले पण जिद्द नाही! कोमलची '९३ टक्क्यांची' दमदार भरारी

**देगलूर** -तालुक्यातील तेलंगणा-कर्नाटक सीमेलगत असलेल्या शिळवणी या छोट्याशा खेडेगावातील कोमल प्रेमकुमार सूर्यवंशी हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत दहावि परीक्षेत तब्बल ९३ टक्के गुण मिळवत यशाचा नवा अध्याय लिहिला आहे. संघर्ष, दुःख आणि जिद्दीची प्रेरणादायी कहाणी ठरलेली कोमलची ही यशस्वी भरारी आज अनेक विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.



दोन वर्षांपूर्वी कोमलच्या आयुष्यात मोठे दुःख आले. वडील प्रेमकुमार सूर्यवंशी यांचे निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. वडिलांचे छत्र हरपल्यानंतर अनेक स्वप्ने अर्धवट राहतात; मात्र कोमलने परिस्थितीसमोर हार मानली नाही. डोळ्यांत मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न आणि मनात शिक्षणाची जिद्द ठेवत तिने अविरत अभ्यास सुरू ठेवला. संकटांना सामोरे जात तिने स्वतःची वाट स्वतःच निर्माण केली. शिळवणीसारख्या ग्रामीण आणि सीमावर्ती गावातून छत्रपती संभाजीनगरसारख्या मोठ्या शहरात येऊन शिक्षण घेणे हे स्वतःमध्ये मोठे आव्हान होते. नवीन वातावरण, आर्थिक अडचणी आणि मानसिक वेदना यांचा सामना करतही कोमलने आपल्या गुणवत्तेचा ठसा कायम ठेवला. श्रीमती वेणूताई चव्हाण कन्या प्रशाला, छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थिनी असलेल्या कोमलने मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ९३ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले. कोमलच्या या यशामुळे केवळ तिचे कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण शिळवणी गाव अभिमानाने भारावून गेले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही योग्य मार्गदर्शन आणि जिद्दीच्या बळावर मोठे यश मिळवता येते, हे तिने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अविनाश वाघ, वर्गशिक्षिका छायाताई दाभाडे, विलास चव्हाण, पवार मॅडम, स्वाती पवार, रोशनी पवार, मनीषा सानप यांनी कोमलचे विशेष कौतुक केले. तसेच क्लासेसमधील संजय कुलकर्णी, अश्विनी कुलकर्णी मॅडम, सागर श्रले आणि साक्षी जोशी यांनी तिच्या मेहनतीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याशिवाय जयपाल गायकवाड, रत्नपाल गायकवाड, जयपाल गायकवाड (मामा), सदाशिव सूर्यवंशी (माजी सरपंच, शिळवणी), पंढरी गायकवाड (आजोबा) नितेश सुर्यवंशी (काका) तसेच समस्त ग्रामस्थांनी कोमलवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाच्या बळावर यश संपादन करता येते, हा प्रेरणादायी संदेश कोमल सूर्यवंशी हिच्या यशोगाथेतून समाजासमोर आला आहे. संघर्षातून उभी राहिलेली ही '९३ टक्क्यांची भरारी' आज अनेक विद्यार्थ्यांना नव्या उमेदीची प्रेरणा देत आहे.

## छ. संभाजी महाराजांच्या राष्ट्रीय जन्मोत्सवासाठी नांदेडचे मावळे रवाना

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ मे -**

विश्वातील सर्वोत्तम राजपुत्र अशी ओळख असलेले युवराज छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती यावर्षी देशाची राजधानी दिल्ली येथे मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. या राष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यासाठी नांदेड जिल्ह्यातील 'छावा' मराठा संघटनेचे पदाधिकारी आणि शेकडो शिवशंभूप्रेमी रेल्वेने दिल्लीकडे रवाना झाले आहेत.

अखिल भारतीय छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने गुरुवारी (ता.१४) रोजी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र



सदनात या भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी वैभव डांगे संस्थापक दिल्ली मराठी प्रतिष्ठान, तर उद्घाटक म्हणून केंद्रीय मंत्री आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

विशेष म्हणजे, दिल्लीमध्ये राष्ट्रीय स्तरावर ही जयंती साजरी होण्याचे हे चौथे वर्ष आहे. महाराष्ट्राच्या थोर सुपुत्राचा वारसा आणि पराक्रम देशाच्या राजधानीत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो.

या जयंती महोत्सवासाठी नांदेड जिल्ह्यातून अनेक मान्यवर आणि शिवप्रेमी उत्साहाने सहभागी झाले आहेत. यामध्ये इंजि. तानाजी हुस्सेकर, प्राचार्य डॉ. कमलाकार कनसे, डॉ. अविनाश पुयड, डॉ. प्रभाकर जाधव, इंजि. एच. एम. पाटील, शिवानंद पाटील, प्रा. अरविंद बोधनकर, संजय हंबर्डे, संजय वांगीकर, दत्ताराम मुंगल, प्रवीण कदम, केशव कल्याणकर, कैलास शिंदे, बबन पाटील आणि सर्वज्ञ हुस्सेकर यांच्यासह 'छावा' मराठा संघटनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

दरम्यान, परभणी आणि छत्रपती संभाजी नगर येथे या शिवप्रेमींचे जोरदार स्वागत करण्यात आले.

## विवाह सोहळ्यात सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १२ मे-**

आजच्या धावपळीच्या आणि दिखाऊपणाच्या युगात अनेक विवाह सोहळे केवळ खर्चिकपणापुरते मर्यादित राहत असताना इस्लापूर येथील जाधव व राठोड परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श उपक्रम राबविला आहे. सानिका जाधव व आदित्य राठोड यांच्या शुभविवाहानिमित्त किनवट येथील संस्थागार वृद्धाश्रमात अन्नदान करून मानवतेचा सुंदर संदेश देण्यात आला.

### सानिका जाधव व आदित्य राठोड यांच्या विवाहानिमित्त वृद्धाश्रमात अन्नदान

दि. ६ मे २०२६ रोजी इस्लापूर येथे मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात हा विवाह सोहळा पार पडला. विवाहाच्या आनंदोत्सवात समाजाप्रती आपली जबाबदारी जपत जाधव व राठोड परिवाराने वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना अन्नदान केले. या उपक्रमामुळे उपस्थितांकडून परिवाराचे कौतुक करण्यात आले.

वधूचे भाऊ साईनाथ पिराजी जाधव (इस्लापूर) यांनी पुढाकार घेत हा सामाजिक उपक्रम आयोजित केला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना प्रेमाने भोजन देत त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विवाहाचा आनंद समाजातील गरजू व ज्येष्ठांसोबत वाटला तरच त्या आनंदाला खरी अर्थपूर्णता प्राप्त होते, अशी भावना यावेळी परिवाराकडून व्यक्त करण्यात आली.

या उपक्रमामुळे विवाह सोहळ्याला सामाजिक जाणीवेची सुंदर जोड मिळाली असून परिसरात जाधव व राठोड परिवाराच्या या कार्याचे विशेष कौतुक होत आहे. आनंदाच्या क्षणी समाजाचे भान ठेवणारे असे उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी आहेत, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

## संतोष औंढेकर यांची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मे -**

नॅशनल धोबी महासंघाच्या सोशल मीडिया प्रदेशाध्यक्षपदी नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष औंढेकर यांची निवड करण्यात आली आहे. नॅशनल धोबी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्राचार्य अनिल मोरे यांनी निवडीचे पत्र औंढेकर यांना नुकतेच पाठविले आहे.

संतोषजी औंढेकर यांनी यापूर्वी जिल्हाध्यक्ष व मराठवाडा अध्यक्ष असताना धोबी समाजासाठी उत्कृष्ट कार्य केल्यामुळेच त्यांची ही निवड करण्यात आली आहे. संतोष औंढेकर यांची निवड झाल्याबद्दल धोबी समाज बांधवांनी स्वागत केले.

## विद्यार्थ्यांचे कागदपत्रे तात्काळ द्या ; नगरसेविका अनुपमा गायकवाड यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १२ मे -**

दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र तसेच इतर शासकीय कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी नगर परिषद बिलोलीच्या नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दहावी व बारावीचे निकाल जाहीर झाल्यानंतर महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा व विविध शैक्षणिक प्रक्रियांसाठी विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांची तातडीची आवश्यकता भासत आहे. मात्र तहसील कार्यालयात दाखल्यांसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून विद्यार्थी व पालकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. तसेच ऑनलाइन प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणी, विलंब व अपुरी कर्मचारी व्यवस्था यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, महिला, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या अर्जांना प्राधान्य देऊन तात्काळ मंजुरी द्यावी, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करावा, अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत तसेच शैक्षणिक प्रवेशाची अंतिम मुदत लक्षात घेऊन विशेष दाखला वितरण मोहीम राबवावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी केली आहे.

## खुरगावला डॉ. गगन मलिक यांचे व्याख्यान

**नांदेड-** तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म वैशाखी पौर्णिमेला झाला आणि महापरिनिर्वाणही वैशाखी पौर्णिमेलाच झाले होते. या निमित्ताने तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात



१९ मे रोजी गगन मलिक फाऊंडेशन चे अध्यक्ष तथा सिनेअभिनेते डॉ. गगन मलिक यांचे व्याख्यान आणि २१ मे रोजी महान त्यागी पुज्य भदंत ज्ञानज्योती महाथेरो यांचे प्रवचन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली. विश्ववंदनीय तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात १९ मे व २१ मे रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला स. ९ वा सुरुवात होणार असून १९ मे रोजी डॉ. गगन मलिक यांचे भारत बौद्धमय करण्याच्या दृष्टीने विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. तर २१ मे रोजी भदंत ज्ञानज्योती महाथेरो यांचे प्रवचन होणार आहे. तसेच राष्ट्रीय प्रबोधनकार राहुलदादा आन्विकर यांचा बुद्ध भीम गीतांचा दणदणीत कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला भिख्खू संघासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तरी जिल्हा व परिसरातील बौद्ध उपासक उपासकांनी शुभ्र वस्त्रे परिधान करून दोन्ही दिवशी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## पीक कर्ज पुनर्गठनात विमा रक्कम अडकली

**नांदेड** -महाराष्ट्रात सर्वाधिक ढगफुटी पाऊस नांदेड जिल्ह्यामध्ये पडला, त्यामुळे त्यांना पीक विमा नुकसान भरपाई मंजूर झाला, परंतु पीक कर्ज पुनर्गठनच्या नावाखाली किसान सन्मान निधी व पीक विमा काही शेतकऱ्यांना न देता वजा केला जातोय, असे कळते. राष्ट्रीयकृत बँक असे करत आहेत. तरी तात्काळ विमा रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश राष्ट्रीयकृत बँकांना देण्यात यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे. खरीप २०२५ मध्ये ढगफुटी दृश्य अतिवृष्टी महाराष्ट्रामध्ये झाली होती.

## मूल्यमापन समिती कडून हिमायतनगर तालुक्यातील विविध लोकभिमुख कामाची पाहणी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ मे -**

तालुक्यातील मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानात सहभागी झालेल्या ग्राम पंचायतचे मुल्यमापन दिनांक ८ मे करण्यात आले.

तालुका स्तरीय समिती अध्यक्ष अनिलकुमार विसावे सहायक गट विकास अधिकारी भुसावळ , सदस्य संजोग भारती विस्तार अधिकारी कृषी पंचायत समिती बोदवड,गोपाल नारायण पाटील केंद्र प्रमुख एनगांव,प्रवीण सपकाळे ग्राम पंचायत अधिकारी, जूनोने दिगर ,सय्यद इकलास ग्राम पंचायत अधिकारी सदस्य हिमायत नगर पंचायत समितीच्या अंतर्गत मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान मध्ये मूल्य मापन करीत आहेत . १७ सप्टेंबर ते ३१ मार्च २०२५ अखेर यात गावातील विविध विकास कामे ,मूलभूत सुविधा,पाणी पुरवठा योजना,वृक्ष लागवड ,अंगणवाडी, प्राथमिक शाळा,स्मशान भूमी ,महिला व पुरुष सार्वजनिक शौचालय ,जलतराची कामे ,रोजगार हमी योजनेची कामे ,महिला बचत गट, लखपती दीदी, पाण्याचा ताळेबंद,रेन वॉटर हार्वेस्टिंग,सोलर ऊर्जा ,आयुष्य मान भारत कार्ड, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान, प्लास्टिक बंदी ,घरकुल ,सी. एस.सी.सेंटर, दिव्यांग लाभ ५ टक्के,महिला व बालकल्याण खर्च १०टक्के, मागासवर्गीय खर्च १५ टक्के खर्च , घन कचरा व्यवस्थापन, सांड पाणी व्यवस्था, लोक सहभागातून श्रमदान, नावीन्य पूर्ण कार्यक्रम ,लोक वर्गणी, ग्राम पंचायतचे १ते३३ नमुना दस्त ऐवज, तक्रार पेटी, तसेच अनेक लोक कल्याणकारी उपक्रम व शासनाच्या कल्याणकारी यांची अंमला बजावणी प्रभावशाली केल्याचे दिसून आले.यात बोरगडी ,करंजी, सिरंजनी व सरसम पोटा (बु) टेभुर्णी ' या पाच ग्राम पंचायत चे मूल्यमापन केले आहे.समितीने काही योजना मध्ये त्रुटी असलेल्या योजना सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

## दांडी बहाद्दर ग्राम विकास अधिकाऱ्याविरोधात कामाजीवाडी ग्रामस्थांचा संताप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मे -**

सध्या उन्हाळा चालू असताना देखील देगलूर तालुक्यातील कामाजीवाडी येथील ग्राम विकास अधिकारी गावात नियमित उपस्थित नसून मागील तीन महिन्यापासून अर्धे गाव पाण्यापासून वंचित आहे. याबाबत त्यांना गावकऱ्यांनी विचारणा केली असता उलट गावकऱ्यांनाच अपमानित करत शिवीगाळ करण्यात येत असल्याने या ग्रामविकास अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी सुधाकर कोंडीबाराव बिरादार व ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

देगलूर तालुक्यातील कामाजीवाडी येथील ग्राम विकास अधिकारी पुरमवार यांच्या कारभारावर गावकरी संताप व्यक्त करत आहेत. मागील तीन महिन्यापासून गावात पाण्याची सोय नाही. त्यातच ग्रामविकास अधिकारी देखील या



गावात फिरकले नसल्याने गावातील समस्या मांडायच्या कुणाकडे असा प्रश्न गावकऱ्यांमध्ये उपस्थित होत आहे. ग्राम विकास अधिकारी यांना फोनवरून विचारले असता बजेट नाही, माहिती नाही अशी उलट सुलट उत्तरे देऊन गावकऱ्यांना शिवीगाळ करीत आहेत. गावामध्ये सातखेडी नळ योजना असताना देखील अर्ध्या गावात पाणी नसल्यामुळे गावात दररोज भांडणे होत असून पाणी समस्या तातडीने सोडवावी तसेच दांडी बहाद्दर ग्रामविकास अधिकाऱ्यावर कारवाई करून त्यांना निलंबित करावी अशी मागणी सुधाकर कोंडीबाराव बिरादार व कामाजीवाडी येथील ग्रामस्थांनी एका निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच देगलूर तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेचा आ. कोहळीकरांनी घेतला आढावा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १२ मे -**

हदगाव येथे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना अंतर्गत हदगाव व हिमायतनगर या दोन्ही तालुक्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दोन्ही तालुक्यांतील एकही शेत पांदण रस्ता अतिक्रमणाखाली राहू नये तसेच सर्व रस्ते तात्काळ मोकळे करून शेतकऱ्यांना सुरळीत वापरासाठी उपलब्ध करून द्यावेत, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश



देण्यात आले.

ज्या शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित शेत पांदण रस्ते तात्काळ खुले करण्याचे आदेश देण्यात आले. यासाठी उपविभागीय अधिकारी, दोन्ही तहसीलदार, पोलीस प्रशासन तसेच भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना कडक सूचना करण्यात आल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्यांचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, भूमी अभिलेख अधिकारी तसेच संबंधित सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करून प्रलंबित अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेमुळे शेतकऱ्यांना शेतीपर्यंत जाण्यास सुलभ मार्ग उपलब्ध होणार असून कृषी विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. राजाराम माणिकराव पेदेवाड, रा. वाघाळा ता. जि. नांदेड यांनी मौ. तुप्पा ता. जि. नांदेड सर्वे नं. ११४ गट क्र. ३३६ क्षेत्र ० हे.३० आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. तुप्पा ता.जि. नांदेड सर्वे नं. ११४ गट क्र. ३३६ क्षेत्र ० हे.३० आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

# वसमतमध्ये अट्टल दरोडेखोर जेरबंद

## हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

वसमत जवळ परभणी ते वसमत रस्त्यावर काहीजण दरोडा टाकण्याच्या उद्देशाने थांबले असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्यानंतर पथकाने तत्काळ कारवाई करीत अट्टल ५ दरोडेखोरांना जेरबंद केले असून त्यामध्ये एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. त्यांच्याकडून ५ गुन्ह्यातील ५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्हयात होणाऱ्या मालाविरूध्दच्या गुन्हयास प्रतिबंध करून गुन्हे उघड करण्याबाबत डॉ. नीलाभ रोहन पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी पोनिमोहन भोसले स्थागुशा हिंगोली यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा व सायबरचे वेगवेगळे पथक गुन्हे प्रिव्हेंन्शन व डिटेक्शन संदर्भाने कार्यवाही करीत आहेत.

वसमत शहरामध्ये एक शटर फोडी होवुन शेतकऱ्याची हळदीची चोरी झाली होती तसेच एक चारचाकी पिकअप वाहन सुध्दा चोरी गेले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे यांचे पथक सदर घटनास्थळी भेट देवुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला. पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, ०५ अट्टल दरोडेखोर नामे ०१ जसविंदर सिंग उर्फ जस्सु पिता रघुवीरसिंग चव्हाण वय २२ वर्षे ०२. बादलसिंग रणजितसिंग चव्हाण वय १९ वर्षे ०३. दिलीपसिंग चव्हाण ०४. अजयसिंग सुरेशपाल चावरीया ०५. विधीसंघर्षग्रस्त बालक (१८ वर्षा पेक्षा कमी वय असलेला) सर्व रा. रेल्वे स्टेशन रोड शिकलकरी वस्ती, वसमत हे दरोडा टाकण्याच्या उद्देशाने वसमत परभणी महामार्गावर काटेरी फांदया आडवे टाकुन थांबले आहेत, अशी माहीती मिळाल्यावरून स्थागुशा पथकाने छापा मारून दरोडेखोरास खंजीर, मिरचीपुड, रस्सी, रॉड या हत्यारासह जागीच पकडुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी वसमत शहरातील ०३ व आखाडा बाळापुर शहरातील ०१ अशा एकुण ०४ घरफोड्या केल्याची व ०१ पिकअप वाहन चोरल्याची कबुली देवुन घेरफोडीमधील चोरलेले अदांजे ०३ लाख रूपयाची हळद, रोखरक्कम व सोन्याचे दागिने व चोरलेली पिकअप असा एकुण ०५ लाख रूप्याचा मुद्देमाल काढुन दिला. सदरचे चोरटे हे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. उपरोक्त चोरटया पैकी अनु.क.०३ व ०४ हे अधांराचा फायदा घेवुन फरार झाले असुन अनुक ०१,०२ व ०५ यांना ताब्यात ध्रुवन चोरीतील जप्त मुद्देमाल व गुन्हयात वापरलेले वाहन यांचेसह पोस्टे वसमत शहर येथे दरोडयाची तयारी संदर्भाने गुन्हा दाखल करून आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी सराईत गुन्हेगार असल्याने आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, .स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार गजानन पोकळे, ज्ञानेश्वर गोरे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, शिवाजी जालमीरे, हरिभाउ गुंजकर सर्व ने. स्थागुशा यांच्या पथकाने केली आहे. गुन्हा उघड व संपुर्ण मुददेमाल हस्तगत केल्याने पोलीस अधीक्षकांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

# नागरिकांनी समस्या असल्यास थेट संपर्क करावा- श्रीराम बांगर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत प्रसारमाध्यमांत वृत्त प्रसिद्ध होताच, नगराध्यक्षांच्या वतीने प्रशासकीय यंत्रणा वेगाने हलली आहे. शहरातील पाणीपुरवठा सुचारू करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू झाले असून, नागरिकांनी कोणत्याही नागरी समस्येसाठी बाहेर चर्चा करण्याऐवजी थेट संपर्क साधावा, असे आवाहन शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांनी नगराध्यक्षा सौ. रेखाताई श्रीराम बांगर यांच्या वतीने केले आहे.

शिवाजी नगर भागातील पाणीपुरवठ्यानंतर तोफखाना, सिद्धार्थ कॉलनी आणि भट्ट कॉलनी येथील पाण्याचे रोटेशन पूर्वीप्रमाणेच पूर्ववत ठेवण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली होती. यावर श्रीराम बांगर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, हे रोटेशन नियमित करून नागरिकांची अडचण दूर करण्याचे आश्वासन दिले आहे. तांत्रिक अडचणी दूर करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत.

शहरातील नागरिकांना आवाहन करताना श्रीराम बांगर म्हणाले की, शहरात पाणीपुरवठा किंवा इतर कोणतीही नागरी समस्या उद्भवल्यास नागरिकांनी संकोच न बाळगता थेट माझ्याशी फोनवर संपर्क साधावा. समस्या सोडवण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. कोणत्याही विषयावर केवळ बाहेर चर्चा करण्यापेक्षा, प्रशासनाला आणि आम्हाला एकदा काम करण्याची संधी द्यावी. जर काम झाले नाही तर आपण त्यावर नक्कीच चर्चा करू शकतो. मात्र नागरिकांच्या हितासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर नगराध्यक्षांच्या वतीने तातडीने दखल घेण्यात आली. या तत्परतेमुळे शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दिसत असून, गटनेते श्रीराम बांगर यांनी स्वतः लक्ष घातल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# वसमतच्या विकास कामांसंदर्भात राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची भाजप नेते अतिष दांडेगावकरांनी घेतली भेट



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ मे**

मुंबई येथे राज्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची अतिश भैय्या दांडेगावकर यांनी सदिच्छा भेट घेत वसमत विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न, पायाभूत सुविधा, नागरिकांच्या मूलभूत गरजा तसेच ग्रामीण व शहरी भागातील विकासकामांना गती देण्यासंदर्भात विविध विषयांवर निवेदन सादर करण्यात आले.

वसमत शहरासह ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य सुविधा, सार्वजनिक विकासकामे आणि इतर महत्त्वाच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. रखडलेली विकासकामे मार्गी लावणे, नव्या योजनांना मंजुरी मिळवून देणे तसेच मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

राज्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी विविध विषय गांभीर्याने ऐकून संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. वसमत मतदारसंघाच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या भेटीमुळे वसमत विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**हिंगोली– उपविभागीय अधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि श्यामकुमार डोंगरे, उपमुख्याधिकारी साबळे, मंडळ अधिकारी सय्यद आयुब यांचेहस्ते विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### अजय सुर्यवंशी यांची पीएसआयपदी निवड



हिंगोली– कळमनुरी तालुक्यातील शेवाळा येथील अजय उत्तमराव सूर्यवंशी हे एसआरपीएफ मध्ये जवान म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी एमपीएससी द्वारा पीएसआयची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. अजय सुर्यवंशी यांची पीएसआय पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा आज शासकीय विश्रामगृह येथे टि.व्ही. इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी पत्रकार मनीष खरात, संतोष भिसे, गजानन पवार, समाधान कांबळे आदींची उपस्थिती होती.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करा

हिंगोली– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. इयत्ता १० वी व १२ वीमध्ये हिंगोली जिल्ह्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रत्येकी रुपये ५ हजार इतकी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. त्यामध्ये शाळेचे निकालपत्र, शाळेचे शिफारसपत्र, इयत्ता १० वी/१२ वी गुणपत्रक, जातीचा दाखला, बँक पासबुकाची छायांकित प्रत, आधार कार्ड प्रत आदी कागदपत्रांचा समावेश असावा. यासंबंधीचे प्रस्ताव संबंधित शाळेचे मुख्याध्यापक अथवा प्राचार्य यांच्यामार्फत सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, हिंगोली येथे सादर करण्यात यावेत, असे आवाहन समाजकल्याणच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती गीता गुठ्ठे यांनी केले आहे.

### औंढ्यात खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

हिंगोली– औंढा नागनाथ येथील पंचायत समिती सभागृहामध्ये खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, जिल्हा गुणनियंत्रक निरीक्षक लक्ष्मण काळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदरील बैठकीत औंढा तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा व विक्रेते यांना खरीप हंगामात सर्व शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व खत कीटकनाशके उपलब्ध होतील .सर्व विक्रेत्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच सर्व कृषी निविष्ठा बियाणे खते व कीटकनाशके विक्रेत्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

# डीएपी खताचा तुटवडा तत्काळ दूर करून शेतकऱ्यांना खत द्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर डीएपी खताची मोठ्या प्रमाणावर टंवाई निर्माण झाली असून जिल्ह्यातील शेतकरी पेरणीपूर्व मशागतीच्या कामात व्यस्त असतांना अनेक कृषी केंद्रावर डीएपी खत उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. तर काही ठिकाणी कृत्रिम तुटवडा निर्माण करून खत साठवून ठेवले जात असल्याच्या तक्रारी देखील शेतकऱ्यांकडून प्राप्त होत आहेत. तत्काळ शेतकऱ्यांना डीएपी खत उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

डीएपी खतांसाठी शेतकरी कृषी केंद्रांवर दिवसभर चकरा मारीत असून वेळेवर खत उपलब्ध होत नसल्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून सर्व कृषी केंद्रावर पुरेसे डीएपी खत उपलब्ध करून द्यावे तसेच साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, काही ठिकाणी सिंगल सुपर फॉस्पेट तथा जिप्सम च्या नावावर बोगस खतांची विक्री सुरू आहे. यासंदर्भात प्रशासनाने ठोस कारवाई करावी अशी मागणी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

# केरोसीन उचलण्यास स्वस्त धान्य दुकानदारांचा नकार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

हिंगोली जिल्ह्यात केरोसीन विक्रीचे कमीशन केवळ एक रूपया लिटर असून ग्राहक आणि केरोसीनची पुरवठा यामध्ये असमतोल असल्याने वादाचे प्रकार होण्याची शक्यता तसेच वितरणाचा निश्चित कालावधी नसल्याने जिल्ह्यातील सुमारे ८०० स्वस्त धान्य दुकानदारांनी केरोसीनची उचल करण्यास नकार दिला आहे.

यासंदर्भात पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील यांच्याकडे स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्यावतीने निवेदन सादर केले आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भिकुलाल बाहेती, सचिन अशोक काळे, शहनवाज गौरी, आसीफ गौरी, फारूक पठाण, बांगर यांच्यासह दुकानदारांची उपस्थिती होती.

शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत केरोसीन वितरणाचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांनाच केरोसीन विक्री करण्याच्या सूचना असून त्यासाठी ६२.९० रूपये दर निश्चित करण्यात आला आहे. त्यात वितरकांना केवळ एक रूपये लिटर प्रमाणे कमीशन दिले जाणार आहे. केरोसीन वितरणाला मिळणारे मार्जीन कमी असल्याने भाग भांडवल गुंतवणे आर्थिकदृष्ट्या नुकसानीचे असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. याशिवाय केरोसनी वितरणासाठी आवश्यक असलेली संसाधने, केरोसीन साठवणुकीसाठी सुरक्षित लोखंडी टाक्या, मोजमाप करणारी मापे वाहतुकीचे साधने, साठवणुक करण्यासाठी सुरक्षित स्थळ नसल्यामुळे केरोसीनचा साठा करावा कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्ह्यात अनेक स्वस्त धान्य दुकानदारांचे अन्न धान्य वितरण कमीशन चार ते सहा महिन्यापसून प्रलंबीत आहेत. अशावेळी केरोसीन वितरण करणे व खर्चिक कामे करणे शक्य नाही. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागातर्फे केरोसीन वितरण किती दिवस सुरू राहील याची शाश्वती नाही. जिल्ह्याला मिळणारे केरोसीन केवळ ६० हजार लिटर असून लाभार्थ्यांची संख्या दीड लाखापेक्षा जास्त आहे. त्यामुळे वादाला तोंड फुटण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले.

# वायचाळ पिंपरी येथील तरूणाचा मृतदेह विहीरीत सापडला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

सेनगाव तालुक्यातील वायचाळ पिंपरी येथील भावी नवरदेवाचा मृतदेह १० किमी अंतरावर असलेल्या आडगाव शिवारातील एका विहीरीत आढळला आहे. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सेनगाव तालुक्यातील वायचाळ पिंपरी येथील ओम अशोक वायचाळ वय २६ हा तरूण शेती करतो. घरी एकुलता एक असल्यामुळे त्याची आई आणि ओम असे दोघेच राहतात. त्याला तीन बहिणी असून त्यांचे विवाह झालेले आहेत.

काही दिवसांपूर्वी ओम याचा विवाह हिंगोली तालुक्यातील एका गावात ठरला होता. विवाह सोहळा दि १० मे रोजी ठरला होता. मात्र त्यापूर्वीच ओमची प्रकृती बिघडल्यामुळे त्याला वाशिम येथील रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यामुळे विवाह दि १४ मे रोजी ठरविण्यात आला होता. ओम याची प्रकृती चांगली झाल्यानंतर त्याच्या घरी विवाह सोहळ्याची तयारी सुरू झाली होती.

दरम्यान दि ७ सायंकाळच्या सुमारास ओम घरी आला. त्यानंतर त्याने हातपाय धूवून जेवण केले. आणि शेतात हळदीकडे चक्कर मारून येतो असे सांगून घरातून निघाला होता. मात्र उशिरा पर्यंत घरी परतला नाही. त्याच्या कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला मात्र कुठेही शोध न लागल्याने अखेर गोरेगाव पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार देण्यात आली. त्यानंतर दि ११ मे रोजी सकाळी आडगाव शिवारातील एका विहीरीमध्ये मृतदेह आढळून आला. बासंबा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता विहीरीतील मृतदेह ओम वायचाळ यांचा असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोली शासकीय रूग्णालयात दाखल केला होता. सायंकाळी उशिरा उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मयत ओम यांच्या मृत्यूचे कारण अद्यापही अस्पष्ट असून उत्तरीय तपासणी अहवालानंतरच कारण स्पष्ट होणार आहे.

# टंचाई निवारणासाठी नवीन विंधन विहीरी व हातपंपांना प्रशासकीय मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

जिल्ह्यातील पाणी टंचाई परिस्थितीच्या अनुषंगाने विविध गावांमध्ये नवीन विंधन विहिरी व हातपंप उभारणीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वसमत, सेनगाव व हिंगोली तालुक्यातील प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित कामांना अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

वसमत व सेनगाव तालुक्यातील पाणीटंचाई आराखड्यात समाविष्ट तसेच प्रपत्र 'ब' प्राप्त झालेल्या १६ गावांमध्ये २३ नवीन विंधन विहिरींच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये वसमत तालुक्यातील आंबा, पळशी, वाखारी, पळसगाव ता. माळवटा, सारोळा तसेच सेनगाव तालुक्यातील रामप्रसाद नगर, भंडारी, हत्ता तांडा, हत्ता, गोंडाळा, गोरेगाव, कहाकर बु., आजेगाव, सवना, कडोळी व उटीब्रम्हचारी या गावांचा समावेश आहे. प्रति विंधन विहिरीस ७८ हजार ५१ रुपये याप्रमाणे एकूण १७ लाख ९५ हजार १७३ रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तसेच हिंगोली तालुक्यातील पारोळा, समगा, घोटादेवी, बोराळा, बोराळवाडी, दुर्गधामणी व भांडेगाव या ७ गावांमध्ये ७ नवीन विंधन विहिरी व हातपंपाच्या कामांसाठी प्रति विंधन विहिरी ७८ हजार ५१ रुपये याप्रमाणे एकूण ५ लाख ४६ हजार ३५७ रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय हिंगोली तालुक्यातील खडकद बु., खानापूर बंगला, खंडाळा, देऊळगाव रामा व गाडीबोरी या ५ गावांमध्ये ६ नवीन विंधन विहिरी व हातपंपाच्या कामांचे सविस्तर अंदाजपत्रक शासन मान्य दराप्रमाणे तयार करण्यात आले असून, त्यासाठी ४ लाख ६८ हजार ३०६ रुपयांच्या खर्चासही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.